नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २७५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### दर्शनासाठी गेलेल्या भाविकावर घाला

मुंबई (स. गांवकरी) : गणेशोत्सवाच्या उत्साहात मुंबईतील लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक येत आहेत. मात्र, बाप्पाच्या दर्शनासाठी जळगावहून मुंबईत आलेल्या एका २५ वर्षीय तरुणाची दर्शनाची आस अखेरची ठरली. दर्शनाच्या रांगेत उभा असताना अचानक प्रकृती बिघडल्याने या तरुणाचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईचा गणेशोत्सव म्हटलं की लालबागच्या राजाचं दर्शन हे अनेक भाविकांचं स्वप्न असतं. राज्याच्या विविध भागांतून भक्त बाप्पाच्या दर्शनासाठी मुंबईत दाखल होतात. तासन्तास रांगेत उभं राहून भाविक आपल्या लाडक्या गणरायाचं दर्शन घेतात. मात्र, याच भक्तीमय वातावरणात घडलेल्या एका घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे.

### पाच रुग्णालये कँटीनसह फायरप्रुफ

मुंबई (स. गांवकरी) : मुंबई महापालिकेच्या येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका रुग्णालय, डॉ. आर एन कुपर रुग्णालय, क्षयरोग रुग्णालय समूह, संत मुक्ताबाई महानगरपालिका रुग्णालय, हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर महानगरपालिका रुग्णालय या रुग्णालयांच्या उपहार गृहांमध्ये कोणत्याही प्रकारची आजवर अग्निसुरक्षेची काळजी घेतली जात नव्हती. परंतु आता यासर्व रुग्णालये आणि उपहारगृहे ही अग्नि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सुरक्षित केली जाणार असून या कामांना लवकरच सुरुवात होणार आहे. मुंबई महापालिकेच्या येथील लोकमान्य टिळक महानगरपालिका रुग्णालय, डॉ. आर एन कुपर रुग्णालय, क्षयरोग रुग्णालय समूह, संत मुक्ताबाई महानगरपालिका रुग्णालय, हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर महानगरपालिका रुग्णालयांमध्ये विविध वार्ड, आयसीयू, ऑपरेशन थिएटर, अपघात विभाग इ. मार्फत अविरतपणे रुग्णांना सेवा दिली जाते. हे विभाग, रुग्णालये २४ तास कार्यरत असतात. त्यामुळे रुग्णसेवेशी संबंधित विविध मशिन्स या उच्च विद्युत दाबावर चालणा-या यंत्राचा वापर सतत सुरु असतो. त्यासाठी याठिकाणी आवश्यकतेनुसार मध्यम व उच्च क्षमतेचे विद्युत पॅनल्स, विद्युत स्विचबोर्ड, एमसीबी बोर्ड बसविण्यात आले आहेत. या रुग्णालयांमध्ये महानगरपालिका कर्मचा-यांकरीता आणि रुग्णांकरीता उपाहारगृह उपलब्ध आहेत व ही उपाहारगृहे सतत कार्यरत असतात.

### पाण्याची हातोहात होणारी चोरी उघड

मुंबई (स. गांवकरी) : महापालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या भरणा केंद्रांवर टँकरद्वारे पाणी भरले जात असून आजवर याठिकाणी दिवसाला किती टँकरमध्ये किती लिटर पाणी भरले याची अचूक नोंद ठेवली जात नव्हती. अशाप्रकारची नोंद ठेवणारी जलमापकेच काही ठिकाणी बंद असल्याने महापालिकेला टँकरमधून गेलेल्या पाण्याची माहिती मिळत नव्हती. परंतु आता महापालिकेच्या सर्व टँकर भरणा केंद्रांवर आयओटी आधारीत इनलाइन अल्टासॉनिक जलमापके बसवली जाणार आहे. त्यामुळे किती पाणी टँकरमध्ये भरले गेले आणि किती टँकरमधून पाणी नेले गेले याची एकत्रित माहिती महापालिकेच्या नियोजन व नियंत्रण विभागाला, तसेच एक्वा सर्व्हरला दैनंदिन स्वरुपात प्राप्त होणार असल्याने पाण्याची होणारी चोरी आता हातोहात पकडता येणार आहे. महापालिकेच्या टँकर भरणा केंद्रावर तत्कालिन महापालिका आयुक्त अजोय मेहता यांच्या निर्देशानुसार,शहर, पश्चिम व पुर्व उपनगरे येथील सर्व टँकर फिलिंग पॉइंटवर जलमापक उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले होते.



# एफडीएची 'फेस्टिव्हल ड्राइव्ह'

## ३.६० लाखांचा गूळ-तुपाचा साठा जप्त

- अयोग्य साठवणुकीमुळे कारवाई
- निकृष्ट दर्जाचा संशय, गूळ व तुपाचे नमुने तपासणीसाठी पाठविले

नगर : (स. गांवकरी)

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाच्या 'फेस्टिव्हल ड्राइव्ह २०२६' अंतर्गत कोपरगाव तालुक्यात दोन ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवाईत एकूण ३.६० लाख रुपये किमतीचा गूळ व तुपाचा साठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, नाशिक विभागाचे संयुक्त आयुक्त एम. यू. माने आणि अन्न विभागाच्या सहाय्यक आयुक्त ए. ए. भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कोपरगाव येथील मे. कांतिलाल हरलाल जोशी यांच्या आस्थापनेवर पहिली कारवाई करण्यात आली. यावेळी २१४९ किलो गूळ आढळून आला. त्याची एकूण किंमत १ लाख १८ हजार १९५ रुपये आहे. या गुळाची साठवणूक अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार निर्धारित पद्धतीने नसल्याचे आढळून आले. तसेच हा गूळ निकृष्ट दर्जाचा असण्याचा संशय असल्याने त्याचा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला.

दुसरी कारवाई मे. माजी आमदार के. बी. रोहमारे दूध शीतकरण, पोहेगाव येथे करण्यात आली. या ठिकाणी गायीचे तूप १४९ किलो, तसेच सुटे तूप ९९ किलो, असा एकूण तुपाचा साठा आढळून आला. या साठ्याची एकूण किंमत २ लाख ११ हजार १४० रुपये आहे. तुपाची साठवणूक अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार योग्य पद्धतीने नसल्याचे आढळले.

तसेच तूप निकृष्ट दर्जाचे असण्याचा संशय असल्याने नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून साठा जप्त करण्यात आला. या दोन्ही कारवाया अन्न सुरक्षा अधिकारी किरण जगदाळे यांनी सहाय्यक आयुक्त (अन्न) ए. ए. भोईटे यांच्या समवेत केली. दरम्यान, जप्त केलेल्या अन्नपदार्थांच्या नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

## गणरायांच्या आशीर्वादासाठी समाजसेवकांची भेट

### पारंपरिक पद्धतीने गणपती बाप्पांचे विसर्जन



नवी मुंबई : (स. गांवकरी)

समाजसेवक अब्बू कुरेशी, अवधेश यादव आणि अल्ताफ भाई यांनी दैनिक समर्थ गावकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन गणरायांचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. यावेळी विशेष म्हणजे दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या वतीने अब्बू कुरेशी, अवधेश यादव आणि अल्ताफ भाई यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर दैनिक समर्थ गावकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणपती बाप्पांचे पारंपरिक पद्धतीने भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. गणरायाच्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला. या कार्यक्रमाला विष्णू बुरे, प्राणीप्रेमी समर्थ बुरे, चंद्रकांत वानखेडे, आशा बुरे, प्राची बुरे, सलोनी बुरे, प्रशांत धनुडे गुंफा धनुडे, रमेश धनुडे यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तुकाराम मुंढेंचा स्वतःच्याच विभागातील अधिकाऱ्यांना मोठा इशारा

मुंबई : (स. गांवकरी)

गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन विभागाकडून राज्यात मोठ्या कारवाया सुरू आहेत. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची जबाबदारी तुकाराम मुंढे यांनी हाती घेतल्यापासून भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात राज्यभरात मोठ्या कारवाया केल्या जात आहेत. भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, भेसळयुक्त मिठाई, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट जेवण, गुटखा विक्रीवर छापे अशा अनेक कारवाया एफडीएकडून करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सध्या तुकाराम मुंढे हे चांगलेच चर्चेत आहेत. दरम्यान, आता तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही तंबी दिली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागातील कामचुकार अधिकारी किंवा कर्मचारी आणि कारवाया करत असताना काही अधिकाऱ्यांकडून तडजोड करण्याचा प्रयत्न झाला का? किंवा होतो का? या पार्श्वभूमीवर बोलताना तुकाराम मुंढे यांनी



आपल्याच विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मोठा इशारा दिला आहे. ते न्यूज 18 मराठी या वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत बोलत होते. कामचुकार किंवा कारवाई दरम्यान तडजोड करणाऱ्या एफडीएच्या अधिकाऱ्यांवरही काही दिवसांत कारवाईची टांगती तलवार असू शकते का? या प्रश्नावर बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "काही दिवसांत म्हणण्यापेक्षा कधीही. जर कोणी कामचुकारपणा करत असेल किंवा कोणी काही तडजोड करताना दिसत असेल तर त्यांच्याबाबत सहानुभूती दाखवण्याचं काही करण नाही.

## व्यसनाधीनता : भविष्याला पोखरणारे अदृश्य संकट

(स. गांवकरी)

तरुणाई म्हणजे आयुष्याला दिशा देणाऱ्या शिक्षण, कौशल्य, रोजगार आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा काळ होय. याच काळात तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा, सिगारेट, मद्य किंवा अमली पदार्थांच्या सेवनाची सुरुवात झाल्यास त्याचे परिणाम केवळ आरोग्यापुरते मर्यादित राहत नाहीत; त्याचा प्रभाव शिक्षण, आर्थिक स्थिती, कौटुंबिक संबंध आणि सामाजिक जीवनावरही पडू शकतो. कुतूहल, मित्रांचा दबाव, ताणतणाव किंवा 'एकदा करून पाहू' या मानसिकतेतून सुरू झालेली सवय काही वेळा नियमित सेवनात आणि पुढे व्यसनाधीनतेत बदलू शकते.

व्यसनांचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी त्यांचे आरोग्यावरील परिणाम गंभीर असू शकतात. तंबाखूजन्य पदार्थ आणि धूम्रपानामुळे तोंडाचे आजार, फुफ्फुसांचे विकार, हृदयविकार आणि विविध प्रकारच्या कर्करोगाचा धोका वाढतो. गुटख्यासारख्या पदार्थांमध्ये निकोटीनसह इतर हानिकारक घटक असतात. मद्याच्या अतिरेकी सेवनाचा यकृतासह शरीरातील विविध अवयवांवर परिणाम होऊ शकतो. अमली पदार्थांच्या वापरामुळे मेंदूचे कार्य, निर्णयक्षमता आणि शारीरिक-मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यसनाकडे केवळ 'वाईट सवय' म्हणून पाहण्यापेक्षा आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या म्हणून पाहणे आवश्यक आहे.



तरुणांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीवरही व्यसनाचा परिणाम होऊ शकतो. अभ्यासातील एकाग्रता कमी होणे, वेळेचे नियोजन बिघडणे, शाळा किंवा महाविद्यालयातील उपस्थितीवर परिणाम होणे आणि जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होणे, अशा समस्या निर्माण होऊ शकतात. रोजगाराच्या ठिकाणी कामातील सातत्य, वेळेचे भान आणि कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता असते. तरुण वय हे ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करण्याचे असताना व्यसनाकडे वळणारी ऊर्जा त्यांच्या विकासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करू शकते. या समस्येचा आर्थिक परिणामही महत्त्वाचा आहे. सुरुवातीला किरकोळ वाटणारा खर्च कालांतराने नियमित आर्थिक भार बनतो. शिक्षण, घरखर्च, बचत किंवा भविष्यासाठी उपयोगी ठरणारा पैसा व्यसनासाठी खर्च होऊ शकतो. आरोग्य बिघडल्यास उपचारांचा अतिरिक्त खर्च वाढतो, तर कामावर परिणाम झाल्यास उत्पन्नाचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे व्यसनाचा आर्थिक ताण व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही; तो कुटुंबाच्या आर्थिक नियोजनावरही परिणाम करतो. व्यसनाची सुरुवात रोखण्यासाठी कुटुंबातील संवाद महत्त्वाचा आहे. मुलांच्या वर्तनात अचानक बदल, अभ्यास किंवा कामाकडे दुर्लक्ष, मित्रपरिवारात अनपेक्षित बदल, पैशांची वाढती गरज किंवा घरातील संवाद कमी होणे याकडे पालकांनी गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. तरुणाशी विश्वासाने संवाद साधणे, समस्येचे कारण समजून घेणे आणि गरज भासल्यास डॉक्टर, समुपदेशक किंवा व्यसनमुक्ती तज्ज्ञांची मदत घेणे अधिक योग्य ठरते. शाळा आणि महाविद्यालयांची जबाबदारीही महत्त्वाची आहे. व्यसनविरोधी जनजागृती एखाद्या दिवसापुरती मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या नियमित शैक्षणिक वातावरणाचा भाग झाली पाहिजे. ताणतणावाचा सामना कसा करायचा, समवयस्कांच्या दबावाला कसे सामोरे जायचे, चुकीच्या सवयींना नकार कसा द्यायचा आणि योग्य निर्णय कसा घ्यायचा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. क्रीडा, वाचन, कला, विज्ञान, सामाजिक उपक्रम आणि कौशल्यविकासाच्या संधी वाढविणेही या दृष्टीने उपयुक्त ठरू शकते.

# राजकारणी आणि पत्रकार एकाच नाण्याच्या दोन बाजू : शिवेंद्रसिंहराजे भोसले

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या 'लातूर भूषण' पुरस्कारांचे शानदार कार्यक्रमात वितरण

लातूर : (स. गांवकरी)

पत्रकारिता ही समाजाचा आरसा असून त्यात सत्याचे प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. अर्धवट अथवा चुकीच्या माहितीच्या आधारे बातम्या देण्यापेक्षा सत्यता पडताळून, सखोल शहानिशा करून तथ्य समाजासमोर मांडावे. खरे तर पत्रकार आणि राजकारणी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे पत्रकारांनी विकासकामांना सकारात्मक दिशा देणारी भूमिका बजावावी, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या जिल्हा शाखा लातूरच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून 'लातूर भूषण' पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे तर स्वागताध्यक्ष म्हणून आमदार अभिमन्यू पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, महापौर जयश्रीताई



सोनकांबळे, प.पू. श्री विद्यानंद सागर महाराज, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, जी. प. मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे आदी उपस्थित होते. समाजसेवा, शिक्षण, प्रशासन, कला-संस्कृती-साहित्य, उद्योग व सहकार, वैद्यकीय सेवा, महिला सक्षमीकरण, पत्रकारिता तसेच अध्यात्म आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला.यावेळी पालकमंत्री भोसले म्हणाले की, पत्रकार आणि राजकारणी यांचा अंतिम उद्देश समाज हितासाठी काम करणे आणि विकासाला गती देणे हा असतो. त्यामुळे पत्रकारांनी लोकप्रतिनिधींची भूमिका, पार्श्वभूमी आणि वस्तुस्थिती समजून घेऊन बातमी मांडावी. एखाद्या व्यक्तीची प्रतिमा केवळ अर्धवट माहितीच्या आधारे मलीन करण्यापेक्षा संपूर्ण वस्तुस्थिती जाणून घेऊन तथ्य समाजासमोर ठेवले, तर पत्रकारितेच्या धर्मालाच खरी प्रतिष्ठा प्राप्त होईल, असे त्यांनी नमूद केले. स्वागताध्यक्ष आमदार अभिमन्यू पवार यांचा मिश्कील शैलीत उल्लेख करताना पालकमंत्री भोसले यांनी उपस्थितांमध्ये हास्याची लहर निर्माण केली. ते म्हणाले, आपले औशाचे आमदार अभिमन्यू पवार हे महाभारतातले अभिमन्यू नाहीत. ते चक्रव्यूहात अडकणारे नव्हे, तर चक्रव्यूहात अडकवणारे अभिमन्यू आहेत. त्यांच्या आग्रह आणि पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांच्या पाठपुराव्यामुळे आपण या कार्यक्रमाला वेळ देऊ शकलो, असे सांगत भोसले यांनी आमदार पवार यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचे कौतुक केले.

### मान्यवरांचा लातूर भूषण पुरस्काराने सन्मान

शरद झरे, विनोद खटके, नेहरू देशमुख, प्रीती शहा, संगमेश्वर केंद्रे, पांडुरंग केंद्रे, शेषराव वाघमारे, ऋषिकेष कराड, रवीशंकर केंद्रे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, मनपा उपयुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, प्रा. सुधाकर सूर्यवंशी, ऐश्वर्या जाधव, उर्मिला बिराजदार, प्रा. सुहास पाचपुते, योगेश पाटील, डॉ. उदय मोहिते, डॉ. नंदकुमार डोळे, सौ. रूपाली बोराडे-पाटील, सौ. विद्याताई पाटील, सौ. मोहिनी निलंगेकर, सुभाष नाईक, अफसर कारभारी, पुरुषोत्तम भांगे, शशिकांत पाटील, जावेद शेख, खय्युम शेख, लिंबराज पन्हाळकर, अमोल घायाळ, शरद राठोड यांचा लातूर भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी पुरस्कार वितरणामागील भूमिका स्पष्ट केली. समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे आणि पुढील वाटचालीस बळ देणे, हा पुरस्कारामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. मात्र समाजाला योग्य दिशा देण्यात साधुसंत, महाराज आणि विविध क्षेत्रांतील प्रबोधनकारांचेही मोठे योगदान आहे. त्यामुळे पत्रकारांनी केवळ राजकीय घडामोडींना प्रसिद्धी देण्यापुरते मर्यादित न राहता साधुसंत, महाराज यांच्या विचारांना आणि समाजप्रबोधनाच्या कार्यालाही व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. त्यांच्या विचारांचा प्रकाश समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवून प्रबोधनाची समृद्ध परंपरा पुढे नेण्याचे काम पत्रकारांनी करावे, असे आवाहन भोकरे यांनी केले. सूत्रसंचालन यु. डी. गायकवाड आणि सुशील सूर्यवंशी यांनी केले तर आभार अशोक हनवते यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशीतेसाठी पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते, जिल्हा कार्याध्यक्ष अफसर कारभारी, महादेव डोंबे, खय्युम शेख, रामप्रसाद काबरा, मनीष हजारे, सुधाकर फुले, हरुन मोमीन, संतोष सोनवणे, लिंबराज पन्हाळकर आदींनी प्रयत्न केले.

# श्रीशैल स्वामी यांची अक्कलकोट विधानसभा प्रमुख पदी नियुक्ती



अक्कलकोट : (स. गांवकरी)

येथील उबाठा चे कट्टर आणि निष्ठावंत शिवसैनिक असलेले श्रीशैल स्वामी यांची शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अक्कलकोट विधानसभा प्रमुख म्हणून म्हणुन निवड झाली आहे. उबाठा शिवसेना पक्षाने श्रीशैल स्वामी यांना बढती देत थेट अक्कलकोट विधानसभा प्रमुख पदावर निवड केली आहे. या निवडी बद्दल अलीकडेच त्यांचा सोलापूर जिल्हा प्रमुख संतोष कदम यांच्या हस्ते आणि अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत येथील सर्जेराव सभागृहात जंगी सत्कार करण्यात आला. श्रीशैल शिवानंद स्वामी हे कट्टर आणि निष्ठावंत शिवसैनिक असून या पुर्वी त्यांच्याकडे बागदरी आणि चपळगावक जिल्हा परिषद गटाची जबाबदारी होती. या दोन्ही जिल्हा परिषद गटामध्ये श्रीशैल स्वामी यांचे काम समाधानकारक ठरल्यामुळे पक्षाने त्यांना प्रमोशन देत थेट अक्कलकोट विधानसभा प्रमुख पदावर नियुक्ती केली आहे. यामुळे त्यांच्या कडे आता जवळपास 9 जिल्हा गटांची जबाबदारी आली आहे. पक्षाने दिलेल्या मोठ्या जबाबदारी मुळे शिवसैनिकात उत्साह पसरला आहे.

पक्षाने आपल्यावर विश्वास ठेवून मोठ्या पदावर काम करण्याची जबाबदारी सोपविली आहे. पक्षाशी आपण निष्ठावान आणि प्रामाणिक राहिल्यामुळे आपणास ही संधी मिळाली आहे पक्षाने विश्वासाने दिलेली जबाबदारी आपण तितक्याच निष्ठेने आणि प्रामाणिक पणाने पार पाडण्यासाठी बांधील राहणार आहे.

- श्रीशैल स्वामी, अक्कलकोट विधानसभा प्रमुख

# पथकांनी जिंकली ग्रामस्थांची मने

## पारंपरिक आदिवासी कला, संस्कृती, संदेश आणि व्यायामाचे महत्त्व यांचे प्रभावी सादरीकरण



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय,डिंगोरे विद्यार्थ्यांनी श्री गणरायांच्या विसर्जन मिरवणुकीत विविध पथकां च्या माध्यमातून पारंपरिक कला,संस्कृती,सामाजिक एकता,आधुनिक तंत्रज्ञान आणि आरोग्याचे महत्त्व यांचे प्रभावी सादरीकरण करून ग्रामस्थांची मने जिंकली विसर्जन मिरवणुकीत विद्या लयाच्या झांज पथक,झेंडा पथक आणि टिपरी पथकाने ग्रामीण महाराष्ट्राची पारंपरिक कला व संस्कृती जपत आकर्षक हालचाली आणि तालबद्ध सादरीकरण केले. आदिवासी बांधवांचे पारंपरिक पावरी नृत्य सादर करून विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृतीची ओळख करून देतानाच सामाजिक एकतेचा संदेश दिला.पॉम-पॉम पथका च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आधुनिकतेचा स्वीकार कर ताना काळानुरूप बदलण्याचा नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा संदेश दिला. तर मंगळागौर पथकाने पारंपरिक वेशभूषा, विविध नृत्यप्रकार आणि महिलांच्या सांस्कृतिक परंपरांचे सादरीकरण करून जुन्या काळातील आठवणींना उजाळा दिला.नन्ही कली' उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी व्यायामाचे महत्त्व, विविध व्यायामप्रकार,सूर्यनमस्कार यांचे संगीताच्या तालावर आकर्षक सादरीकरण केले. हातात घोषफलक घेऊन 'निरोगी शरीरासाठी नियमित व्यायाम करा' असा आरोग्य विषयक संदेशही त्यांनी ग्रामस्थांपर्यंत पोहोचविला. या विविध पथकांच्या माध्य मातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना व्यासपीठ मिळाले. पारंपरिक कला व संस्कृतीचे जतन, आदिवासी संस्कृतीचा सन्मान, सामाजिक एकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि निरोगी जीवनशैली यांसारखे विविध सामाजिक संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणातून दिले. विद्यार्थ्यांच्या या बहारदार सादरीकरणाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दत्तात्रय घोलप, दीपा जगदाळे, साधना तांबे, अनुराधा नरवडे, मंगेश कोंढार, रतिलाल बागुल, वैभव देशमुख, जगन्नाथ गाढवे, किसन भुतांबरे, मोनिका उकिरडे, स्नेहल लोहोटे, दिनेश पाटील, मंगेश डुंबरे व शिवाजी उकिरडे यांनी विशेष मेहनत घेतली."विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देतानाच त्यांच्या मध्ये सामाजिक जाणीव, सांस्कृतिक अभिमान, आधुनिक दृष्टिकोन आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने विविध पथकांची संकल्पना करण्यात आली.

# न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

- आरोपांना ठोस पुराव्याचा आधार नसल्याचे न्यायालयीन सुनावणीत स्पष्ट
- सात साक्षीदारांची तपासणी

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील चिचपाडा परिसरात सन २०१८ मध्ये घडलेल्या अल्पवयीन मुलाच्याआत्महत्येप्रकरणी गावातील पंच मंडळींवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालामुळे तब्बल काही वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकरणाला न्यायालयीन पातळीवर पूर्णविराम मिळाला आहे.

या प्रकरणात फिर्यादी मनोहर पांडुरंग ठाकरे यांच्या फिर्यादीवरून सोनू अंबू गांगुडे, काळू रामा ठाकरे, हिरामण सोनू वाघ यांच्यासह संबंधित पंच मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. संबंधित सर्व आरोपी कळवण तालुक्यातील चिचपाडा परिसरातील रहिवासी असल्याचे कागदपत्रात नमूद आहे. गावातील एका घटनेच्या पार्श्वभूमीवर मृत मुलाचा मित्र याला मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा गणेश पोपट ठाकरे याच्यावरही दबाव निर्माण करण्यात आल्याचाआरोप करण्यातआला होता. त्याच्यावर दंड आकारण्यातआल्याचे तसेच त्याला मारहाण केली जाईलआणि शाळेतून काढून टाकले जाईल,अशा दबावामुळे त्याने आत्महत्या केल्याचा आरोप फिर्यादीकडून करण्यातआला होता. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार,दि.२६ सप्टेंबर २०१८ रोजी गणेश ठाकरे याने शेतातीलआंब्याच्या झाडाला गळफास घेऊनआत्महत्या केली. या घटनेनंतर संबंधित आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३०५ व ३४अन्वये गुन्हा दाखल करण्यातआला होता.या प्रकरणाची गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०/२०१८अशी नोंद असल्याचे कागदपत्रात नमूद आहे.

# गणेशोत्सवाच्या समृद्ध परंपरेला डिजिटल व्यासपीठ

ठाणे : (स. गांवकरी)

- 'Bappa.org' डिजिटल उपक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे – जिल्हा परिषद ठाणेचे आवाहन

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा, लोकसहभाग, सजावट, सामाजिक उपक्रम तसेच बाप्पाशी संबंधित आठवणी डिजिटल स्वरूपात जतन करण्यासाठी नागरिकांनी 'Bappa.org' या डिजिटल उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुढाकारातून गणेशोत्सवाशी संबंधित विविध पैलू डिजिटल स्वरूपात दस्तऐवजीकरण करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून नागरिकांना आपल्या घरातील तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाची माहिती, छायाचित्रे, व्हिडिओ, सजावट, पारंपरिक पद्धती, सामाजिक उपक्रम आणि बाप्पाशी निगडित आठवणी डिजिटल स्वरूपात नोंदविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी Bappa.org या डिजिटल व्यासपीठावर नोंदणी करून आपल्या गणेशोत्सवाशी संबंधित एक छायाचित्र तसेच त्यामागील कथा, परंपरा किंवा आठवण नोंदवावी. यशस्वी नोंदणीनंतर सहभागी नागरिकांना अधिकृत सहभाग प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशा प्रकारे राज्यातील विविध भागांतील गणेशोत्सवाच्या परंपरा, लोककला, सामाजिक उपक्रम आणि सांस्कृतिक वारसा यांचे डिजिटल दस्तऐवजीकरण होण्यास मदत होणार आहे.

# आरोग्य विषयक विद्यार्थी जनजागृती कार्यशाळा उत्साहात संपन्न




आळेफाटा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित, श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विषयक विद्यार्थी जनजागृती कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना एड्स, एच.आय.व्ही. (HIV) आणि क्षयरोग (टीबी) या आजारांबाबत सविस्तर मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. या आजारांची कारणे, लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, वेळेवर निदान व उपचाराचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच आरोग्याबाबत समाजामध्ये असणारे गैरसमज दूर करून योग्य माहितीचा प्रसार करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. संदेश थोरात, समुपदेशक तसेच श्री. दत्तात्रय रोकडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ग्रामीण रुग्णालय, नारायणगाव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत एड्स व एचआयव्हीबाबत आवश्यक काळजी, प्रतिबंध आणि सामाजिक भेदभाव टाळण्याचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच क्षयरोगाचे वेळीच निदान करून नियमित उपचार घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, अशी माहिती दिली.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होऊन आरोग्याबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारून मार्गदर्शकांकडून शंकांचे निरसन करण्यात आले. प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांनीही मनोगत व्यक्त करताना सर्वांनी शासकीय रुग्णालयामध्ये औषधोपचार घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर महाविद्यालयाचे प्राचार्य विविध विभागांचे विभाग प्रमुख आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल पडवळ यांनी केले तर प्रा. आकाश धुमाळ यांनी आभार मानले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## कोपरखैरणेत रस्त्यालगत वाहन पार्किंगमुळे घंटागाडीला अडथळा!

नवी मुंबई (स. गांवकरी) : कोपरखैरणे विभागातील काही रस्त्यांच्या कडेला वाहने उभी केल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या घंटागाडीला कचरा संकलनासाठी परिसरात फिरताना अडथळा निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांकडून दैनंदिन कचरा संकलन करण्यात अडचणी येत असून काही ठिकाणी कचरा उचलण्यास विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रस्त्याच्या कडेला इको अथवा इतर वाहने उभी करताना वाहनचालकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. आपले वाहन अशा ठिकाणी पार्क करावे की, त्यामधून इतर वाहनांना तसेच महापालिकेच्या घंटागाडीला ये-जा करण्यासाठी पुरेसा मार्ग उपलब्ध राहील. नागरिकांना नियमित कचरा संकलनाची सुविधा मिळावी आणि वाहतुकीलाही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी वाहनचालकांनी योग्य ठिकाणी पार्किंग करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.



## तालुकास्तरीय नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कुरण येथे इयत्ता २ री,३ री व ४थी नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण ३टप्प्यां त पार पडले.जिल्हा परिषद पुणे,जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था,पुणे तसेच पंचायत समिती जुन्नर,पुणे यांचे संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यात नवीन अभ्यासक्रमाची ध्येय धोरणे,राज्य शैक्षणिक आराखडा,सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन,समग्र मूल्यमापन पद्धती,शिक्षकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या,सकारात्मक दृष्टीकोनातून कृतियुक्त अध्यापन इ.विषयांवर चर्चा झाली.प्रशिक्षणासाठी जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ८१५ प्राथमिक शिक्षकांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. सदर प्रशिक्षणाचे संपूर्ण कामकाज विषयतज्ञ सचिन गुंजाळ,रविंद्र तोरणे,दिपाली थोरात यांनी पाहिले.प्रशांत ढवळे,गुणवंत केदारी,रुपेश पवार,चंद्रकांत पारधी,मारुती साबळे,राजेंद्र भवारी,सोनाली बेलेकर,अंकुश साबळे, जयसिंग मोजाड,लक्ष्मण पारधी,विठ्ठल जोशी,अनिल रढे,मोघा ताते,निखिल पवार, राहुल कोरडे,विलास किरवे, सुरेश पारधी,सविता डुंबरे, यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावली.डॉ.विकास गरड- वरिष्ठ अधिव्याख्याता, पुणे यांच्या प्रयत्नातून ऑन लाईन रजिस्ट्रेशन,उपस्थिती, प्रशिक्षण प्रमाणपत्र,कार्यमुक्ती यांसाठी टी एम एस डिजीटल प्रणाली चा अंतर्भाव करण्यात आला. ही प्रणाली लवकरच राज्य स्तर प्रशिक्षणासाठी स्वीकार ण्यात येणार आहे.राजश्री तिटकारे अधिव्याख्याता डायट पुणे,अशोक लांडे - गटशिक्षणाधिकारी जुन्नर, अशोक गोडसे, विष्णू धोंडगे- विस्तार अधिकारी, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## ओतूरच्या ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वराचा प्रथम महारुद्राभिषेक

- २१ सप्टेंबरला ११ पुरोहितांच्या मंत्रोच्चारात धार्मिक सोहळा

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वर देवाच्या प्रथम महारुद्राभिषेक सोहळ्याचे आयोजन सोमवार (ता. २१ सप्टेंबर) रोजी श्री कपर्दिकेश्वर मंदिरात करण्यात आले आहे. वेदमूर्ती श्री. अमित जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ११ पुरोहितांच्या मंत्रोच्चारात हा धार्मिक सोहळा होणार आहे. महारुद्राभिषेक सोहळा सकाळी ९ ते ११ या वेळेत होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महारुद्राभिषेकामुळे मंदिर परिसरात भक्तिमय व मंगलमय वातावरण निर्माण होणार आहे. वेदमूर्ती घनपाठी श्री. अमित जोशी हे गुरूजी ज्योतिषाचार्य असून, आळंदी देवाची येथील वेदशाळेचे तसेच काशी येथील कामकोटी पीठाचे मार्गदर्शक असून त्यांनी पुणे येथे १८ वर्षे वेद अध्यापन केले आहे.

# शिवांजली विद्यानिकेतनमध्ये स्वच्छता, मेहनत, यश व एचआयव्ही/एड्स जनजागृतीपर व्याख्यान



आळेफाटा : (स. गांवकरी)

शिवांजली ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित शिवांजली विद्यानिकेतन, चाळकवाडी येथे गणेशोत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शनपर व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वच्छता अभियान, मेहनत आणि यश या विषयावर श्री. संतोष जेडगुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. स्वच्छतेचे महत्त्व, स्वच्छ परिसराची गरज तसेच जीवनात मेहनत, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून यश कसे संपादन करता येते, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच इंटेन्सिफाइड आयईसी कॅम्पेन अंतर्गत एचआयव्ही/एड्स संवेदनशीलता व जनजागृती या विषयावर विद्यार्थ्यांसाठी माहिती व मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी श्री. संदेश थोरात, समुपदेशक तसेच श्री. दत्तात्रय रोकडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ग्रामीण रुग्णालय, नारायणगाव यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही/एड्सविषयी आवश्यक माहिती, प्रतिबंधात्मक उपाय आणि जनजागृतीपर मार्गदर्शन केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील गैरसमज दूर करून योग्य माहिती व जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. बंडू सदामते यांनी केले, तर कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. भानुदास चासकर यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चाळकवाडीचे मुख्याध्यापक श्री. गणेश जाधव, श्री. अशोक कुऱ्हाडे, श्री. प्रशांत शेटे, श्री. संतोष चव्हाण, श्री. विष्णू बोरसे, श्रीमती कमल शिरोळे, श्री. अण्णासाहेब घुले, श्री. बाळू बारवेकर, श्री. चंद्रकांत साळवे,संतोष जेडगुले, सौ. वैशाली चासकर मुख्याधपिका शिवांजली प्राथमिक विद्यालय चाळकवाडी, श्रीमती आशा पानसरे व शाळेतील विध्यार्थी उपस्थित होते. गणेशोत्सव काळात विद्यालयात विवीध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्वच्छता, मेहनत, यश, पर्यावरण संवर्धन तसेच एचआयव्ही/एड्सविषयी जनजागृती अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मिळालेले मार्गदर्शन त्यांच्या ज्ञानात व सामाजिक जाणीवेत भर घालणारे ठरले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# तहसीलदार अभयराज नंजुडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

मुखेड : (स. गांवकरी)

मुखेड येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणात 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार अभयराज नंजुडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मराठवाडा मुक्ती साठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. मुखेड तहसिल कार्यालयाला पूर्ण पणे सजावट करून मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या कार्यक्रमा प्रारंभी राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. त्यानंतर मराठवाड्याच्या मुक्तीसाठी निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध संघर्ष करत आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामातील शूरवीरांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या बलिदानामुळे 17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगितले. तहसीलदार अभयराज नंजुडे व आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड, खुशाल पाटील उमरदरीकर, माजी नगराध्यक्ष गंगाधरजी राठोड, बळवंत पाटील बेटमोगरेकर, माजी नगराध्यक्ष जगदीश शेठ बियाणी, उपनगराध्यक्ष राजकुमार बामणे, नागनाथ लोखंडे, व्यंकटराव लोहबंदे, नंदकुमार मडगूलवार, अशोक गजलवाड, किशोर चव्हाण, राजू घोडके, नायब तहसीलदार शालिनी धुळे, निलेश रोहनकर, मंडळाधिकारी गरुडकर, महसूल सहाय्यक संदीप भुरे, ग्राम महसूल अधिकारी औदुंबर वाडीकर,शिंदे साहेब यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



किनवट : (स. गांवकरी)

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त नगर परिषद किनवट येथे गुरुवारी (दि.१७) सकाळी ७.५० वाजता नगराध्यक्ष सौ. सुजाताताई येंड्रलवार यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी रोहित भगरे, उपाध्यक्ष हसन लाला खान, चंद्रशेखर रंगराव नेमानिवार नगर परिषद सदस्य, अधिकारी-कर्मचारी, सफाई कर्मचारी, पत्रकार तसेच शहरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजकार्याच्या भावनेतून जनसेवेचा अनोखा उपक्रम

## गुरुदत्त कृषी सेवा केंद्राकडून ५१ खुर्च्या विनामूल्य उपलब्ध

**पंचक्रोशीतील सर्व नागरिकांसाठी उपयुक्त पाऊल मोकभनगी**



कळवण : (स. गांवकरी)

समाजकार्याची भावना मनात ठेवून जनसेवेचा ध्यास घेत मोकभनगी, ता.कळवण येथील गुरुदत्त कृषी सेवा केंद्राने एकअनोखा आणि कौतुकास्पद उपक्रम सुरू केला आहे.मोकभनगी परिसरासह पंचक्रोशीतील नागरिकांच्या सुख-दुःखाच्या विविध कार्यक्रमांसाठी गुरुदत्त कृषी सेवा केंद्राच्या वतीने ५१खुर्च्या विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मोकभनगी परिसरातील काकाणे, खेडगाव,धनेर, दसराणे,रवळजी, दरेभनगी,मोकभनगी, इंची,नांळीद तसेच परिसरातील इतर गावांमधील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेता येणारआहे.लग्नसमारंभ,दशक्रिया विधी, धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, बैठक तसेच इतर सुख-दुःखाच्या प्रसंगी नागरिकांना खुर्च्यांचीआवश्यकता भासते. अशावेळीआर्थिक भार कमी व्हावा आणि सामाजिक बांधिलकी जपली जावी,या उद्देशाने गुरुदत्त कृषी सेवा केंद्राने मोकभनगी ५१ खुर्च्या जनसेवेसाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलाआहे. व्यवसायासोबतच समाजाप्रतीआपली जबाबदारी जपण्याचा हा प्रयत्नअसून, 'समाजासाठी काहीतरी देणे हीच खरी सेवा' या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचे पंचक्रोशीतील नागरिकांकडून स्वागत होत असून, इतर व्यावसायिकांनीही अशा सामाजिक उपक्रमांतून जनसेवेसाठी पुढाकार घ्यावा,अशीअपेक्षा व्यक्त होत आहे. गुरुदत्त कृषी सेवा केंद्राचा हा उपक्रम व्यवसायापलीकडे जाऊन माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा आदर्श ठरतआहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### काळ्या फिती लावून न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी नोंदविला शासनाचा निषेध

■ 'समान काम, समान वेतन'ची मागणी मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा

भोकर (स. गांवकरी) : उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी भोकर न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि. १६) काळ्या फिती लावून शांततामय मार्गाने शासनाचा निषेध नोंदविला. कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवत शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधले. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने वेतनश्रेणीच्या मागणीसाठी यापूर्वीच शासनाला आंदोलनाची इशारा-वजा नोटीस दिली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बुधवारी काळ्या फिती लावून शासनस्तरावर होत असलेल्या दप्तर दिरंगाईचा निषेध केला. या आंदोलनात सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उच्च न्यायालयाने गठित केलेल्या न्यायमूर्तींच्या विशेष समितीचा अहवाल शासनाला सादर झालेला असतानाही वेतनवाढीच्या प्रश्नावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्यामुळे महासंघाने आंदोलनाची पुढील रूपरेषा जाहीर केली आहे. त्यानुसार १६ व १७ ऑक्टोबर रोजी पुन्हा काळ्या फिती लावून निषेध करण्यात येणार आहे. त्यानंतरही मागणी मान्य न झाल्यास ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा आंदोलन करण्यात येईल. तरीही शासनाकडून सकारात्मक निर्णय न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य न्यायाधीश संघटनेसह विविध वकील संघटना तसेच आमदार, खासदार आणि इतर लोकप्रतिनिधींनी पाठिंबा दर्शविल्याचे महासंघाकडून सांगण्यात आले.

### ११८ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांची आरक्षण सोडत २२ सप्टेंबरला




■ तहसील कार्यालयातील पंचायत समिती सभागृहात सकाळी १० वाजता आयोजन

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता काढण्यात येणार आहे. तहसील कार्यालय, हदगाव येथील पंचायत समिती सभागृहात ही प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती तहसील कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशानुसार, हदगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी आरक्षण सोडत आयोजित करण्यात आली आहे. या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग तसेच खुल्या प्रवर्गातील सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे.तालुक्यातील एकूण ११८ सरपंच पदांपैकी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी २६, अनुसूचित जमातीसाठी १४, नागरिकांचा मागासवर्गासाठी १९ आणि खुल्या प्रवर्गासाठी ५९ पदे निश्चित करण्यात आली आहेत. यामध्ये महिलांसाठी एकूण ६० पदे राखीव आहेत. आरक्षण सोडतीच्या प्रक्रियेसाठी संबंधित नागरिक, ग्रामपंचायत प्रतिनिधी व इच्छुकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार सय्यद उमर यांनी केले आहे.

### ओतूरच्या ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वराचा प्रथम महारुद्राभिषेक

■ २१ सप्टेंबरला ११ पुरोहितांच्या मंत्रोच्चारात धार्मिक सोहळा

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्रामदैवत श्री कपर्दिकेश्वर देवाच्या प्रथम महारुद्राभिषेक सोहळ्याचे आयोजन सोमवार (ता. २१ सप्टेंबर) रोजी श्री कपर्दिकेश्वर मंदिरात करण्यात आले आहे. वेदमूर्ती श्री. अमित जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ११ पुरोहितांच्या मंत्रोच्चारात हा धार्मिक सोहळा होणार आहे. महारुद्राभिषेक सोहळा सकाळी ६ ते ११ या वेळेत होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महारुद्राभिषेकामुळे मंदिर परिसरात भक्तिमय व मंगलमय वातावरण निर्माण होणार आहे. वेदमूर्ती घनपाठी श्री. अमित जोशी हे गुरूजी ज्योतिषाचार्य असून, आळंदी देवाची येथील वेदशाळेचे तसेच काशी येथील कामकोटी पीठाचे मार्गदर्शक असून त्यांनी पुणे येथे १८ वर्षे वेद अध्यापन केले आहे. या महारुद्राभिषेक सोहळ्याचे यजमान उद्योजक श्री. मारुती एकनाथ पानसरे व परिवार आहेत. श्री कपर्दिकेश्वर देव धर्मसंस्था, ओतूरचे अध्यक्ष अनिलशेठ तांबे, सचिव महेंद्र (गांधी) पानसरे तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महारुद्राभिषेकासाठी ओतूर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री कपर्दिकेश्वराचे दर्शन व धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री कपर्दिकेश्वर देव धर्मसंस्था यांच्याकडून करण्यात आले आहे.

### हनुमान तरुण गणेश उत्सव मंडळ कबाडवाडी यांच्याकडून ५५ रक्तदानाचे आयोजन



शिवनेरी (स. गांवकरी) : किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी वसलेले हनुमान तरुण गणेश उत्सव मंडळ व समस्त ग्रामस्थ कबाडवाडी , पाडळी यांनी गुरुवार दिनांक १७ भव्य रक्तदान शिबिर आयोजित करून ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाज उपयोगी उपक्रम राबवून या माध्यमातून एकीचा संदेश दिला . याप्रसंगी अध्यक्ष पियुष पापडे , उपाध्यक्ष रोहन कबाडी, कार्याध्यक्ष प्रसाद पापडे , खजिनदार ऋषिकेश कबाडी , सह खजिनदार अद्वैत बढे , सचिव साहिल ठोंबरे सहसचिव हर्षद लांडे यांनी मनोगत व्यक्त केले. हनुमान तरुण गणेश उत्सव मंडळ कबाडवाडी यांनी गणेश उत्सव निमित्त भजन ,सामाजिक , धार्मिक , शैक्षणिक व विविध कार्यक्रम राबविलेले आहेत याप्रसंगी महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्ष महेंद्र कबाडी , कृणाल कबाडी, साहिल पवार , रोहन पापडे , कल्पेश गायकवाड , विशाल केदारी इतर मान्यवर उपस्थित होते. अशी माहिती माजी उपसरपंच अरुण पापडे यांनी सांगितली.

# सेवाभावातून गावागावांत विकासाचा संकल्प

## पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ; १,३२२ ग्रामपंचायतींत विविध उपक्रमांना सुरुवात




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

शासनाच्या सेवा संकल्प अभियानाचा नांदेड जिल्ह्यात पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते १७ सप्टेंबर रोजी शुभारंभ करण्यात आला. जिल्ह्यातील १ हजार ३२२ ग्रामपंचायतींमध्ये या अभियानाला सुरुवात झाली असून, गावपातळीवर शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच प्रलंबित कामांचा निपटारा, स्वच्छता, आरोग्य, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि विविध लोककल्याणकारी उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला. अभियानाच्या प्रारंभी जिल्ह्यातील गावागावांत सेवाभावाची शपथ घेण्यात आली. उपस्थित नागरिकांना शासनाच्या विविध योजना आणि लोककल्याणकारी उपक्रमांची माहिती देण्यात आली. शासनाच्या विविध योजनांचे लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या हस्ते आशीर्वादाचा दिवा प्रज्वलित करण्यात आला. यासोबतच अनेक गावांमध्ये ग्रामस्वच्छता उपक्रम आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. देशसेवेत योगदान देणाऱ्या माजी सैनिक तसेच हुतात्मा जवानांच्या कुटुंबीयांचा गावागावांत सन्मान करून त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून महिनाभर गावपातळीवर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये नवीन बचत गटांची स्थापना, शाळा, अंगणवाडी तसेच वैयक्तिक कुटुंबांना नळ जोडणी, दुर्लक्षित ठिकाणांची स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कापडी पिशव्यांच्या वापराबाबत जनजागृती, निबंध व चित्रकला स्पर्धा, दिव्यांग व्यक्तींची नोंदणी, वृक्षारोपण, भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण, आरोग्य व पोषणविषयक मार्गदर्शन आदी उपक्रमांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांना जात, उत्पन्न व स्थानिक रहिवासी प्रमाणपत्र मिळवून देणे, महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम, किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य व मार्गदर्शन शिबिरे, सायबर सुरक्षेबाबत जनजागृती, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन, आधार नोंदणी, कर वसुली, आयुष्मान भारत कार्ड नोंदणी तसेच विविध ऑनलाइन सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यावरही अभियानात भर देण्यात येणार आहे.

सेवा संकल्प अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन सूक्ष्म नियोजन केले आहे. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचा अभियानात समन्वयाने समावेश करण्यात आला असून, गावपातळीवरील नागरिकांच्या गरजा आणि प्रलंबित कामांचा आढावा घेऊन त्यावर कार्यवाही करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

शिक्षण, आरोग्य, बांधकाम, पाणीपुरवठा, स्वच्छता, समाजकल्याण, महिला व बालविकास, कृषी, पशुसंवर्धन, ग्रामपंचायत, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सामान्य प्रशासन आदी विभागांच्या माध्यमातून सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध कामे आणि उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित कामांचा निपटारा होऊन विकासकामांना गती मिळण्यासोबतच शासनाच्या विविध सेवा आणि योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

## सेवा संकल्प अभियानातून नांदेड जिल्ह्यात आरोग्य सेवांना गती

■ १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान विशेष आरोग्य तपासणी, जनजागृती व सेवा उपक्रम

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत नांदेड जिल्ह्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. ग्रामीण व शहरी भागातील शेवटच्या घटकापर्यंत सुलभ, दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली. या अभियानात 'नागरिक प्रथम' हा दृष्टिकोन ठेवून विविध आरोग्य तपासण्या, विशेष आरोग्य शिबिरे, उपचार व जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत पात्र नागरिकांना कार्ड उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच ७० वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना मोफत उपचारासाठी 'वय वंदना कार्ड' प्राधान्याने वितरित करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. यामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग तसेच मोतीबिंदू तपासणीवर विशेष भर देण्यात येणार आहे. तीव्र व मध्यम रक्ताक्षय असलेल्या गर्भवती महिलांसाठी विशेष मोहीम राबवून आवश्यक उपचारांसह FCM (Ferric Carboxy Maltose) इंजेक्शन देण्यात येणार आहे.

## तामसा येथे पंतप्रधान मोदीजींच्या दीर्घायुष्यासाठी महा-होमहवन; कारसेवकांचा सत्कार



तामसा : (स. गांवकरी)

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी तसेच त्यांच्या हातून देशसेवेचे कार्य अखंडपणे घडत राहावे, यासाठी तामसा येथील श्रीराम मंदिरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने महा-होमहवन, यज्ञ व महाआरतीचे आयोजन करण्यात आले.

१७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणूनही साजरा केला जात असल्याने, मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना यावेळी विनम्र अभिवादन करण्यात आले. हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करत त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, यासाठीही होमहवनामध्ये प्रार्थना करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन भाजप हदगाव पूर्व मंडळाच्या वतीने, तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तामसा शहराध्यक्ष शिवराज वारकड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

वैदिक मंत्रोच्चाराच्या वातावरणात होमहवनामध्ये आहुती देण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी देशाची प्रगती, राष्ट्राची समृद्धी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या विकासासाठी प्रार्थना केली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने तामसा नगरीतील कारसेवकांचा विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये विश्वंभर देशमुख, केदार ढेगळे, गणपत शेट्टे, गोविंद निलावार, रमेश देशमुख आणि इरबा पाटील यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी भाजपचे तामसा गट प्रभारी डॉ. संदीप कारंजकर, ज्येष्ठ पदाधिकारी अर्जुनजोशी, शशिकांत बंडावार, संजय सोमेवाड, विशाल पेंटेवाड, दिनेश मेहेत्रे, डॉ. दीपक नाईक, किरण वारकड, राहुल शिंदे, सचिन तांदळे, अमोल तामसेकर, नागेश फुलारी, गणेश जगडे, सुशिल मेहेत्रे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक कार्यक्रम, हुतात्म्यांचे स्मरण आणि कारसेवकांचा सन्मान अशा विविध उपक्रमांचा संगम या कार्यक्रमातून साधण्यात आला.

## चैतन्य विद्यालयाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत भक्तीचा जल्लोष

### शिस्तबद्ध वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप




ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालयात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. गणेश विसर्जनानिमित्त विद्यालयातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी शिस्तीचे दर्शन घडवत विविध पथकांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कलेचे प्रभावी सादरीकरण केले.

या मिरवणुकीत ढोल पथक, झांज पथक, झेंडा पथक, नरसिंह थीम पथक, लेझीम पथक, सोलापुरी लेझीम पथक, दहीहंडी पथक, आदिवासी नृत्य पथक, लाठी-काठी पथक, स्वयंसेवक पथक, ट्रॅक्टर सजावट पथक तसेच विविध वेशभूषेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध पथकांमधून भक्ती, उत्साह, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक संदेशांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने तसेच ढोल-ताशे, झांज आणि लेझीमच्या गजराने परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीदरम्यान विद्यार्थ्यांनी शिस्त व सुरक्षिततेचे पालन केले. तसेच गणेश विसर्जनानंतर परिसर स्वच्छ ठेवण्याचे आणि पर्यावरण संवर्धनाचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

"गणरायाने सर्वांना सुख, समृद्धी व आरोग्य द्यावे," अशी प्रार्थना करून विद्यार्थ्यांनी गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रतीक अकोलकर यांनी मिरवणुकीची माहिती दिली. मिरवणुकीत सहभागी झालेल्या विविध पथकांना राजाराम शिंदे, अमित झरेकर, संतोष कांबळे, विशाल चौधरी, मिलिंद खेत्री, बाळासाहेब साबळे, मंगेश तांबे, सोनाली माळवे, आशा गाडेकर, लक्ष्मण दुडे, वनिता भोर, शिल्पा भालेराव, अजित डांगे, सोनाली कांबळे, आसावरी गायकर, देवचंद नेहे, सरस्वती भताने, प्रमोद जाधव, अनिल जवरे, दिनेश ताठे, रसिका शेळके, आशा डुंबरे, अश्विनी नलावडे, अनुराधा इसकांडे, निर्मला डोंगरे, साक्षी देशमुख, प्रसन्न तांबे, ईश्वर ढमाले, अरविंद आंबरे, मयूर जाधव, विजय खरात, भाऊसाहेब ठोसर, तेजस ढमाले व दीपक हांडे आदींनी मार्गदर्शन केले. यावेळी ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, संजय हिरे, भाऊसाहेब खाडे, विश्वास पाटील डुंबरे, नितीन तांबे, संजय वल्हवणकर, शेखर डुंबरे, नितीन डुंबरे, झांबर जाधव, सागर दाते, पांडुरंग ताजणे तसेच मोठ्या संख्येने पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'सेवा संकल्प अभियान' गांभीर्याने व प्रभावीपणे राबवावा



नाशिक : (स. गांवकरी)

शासनाच्या लोककल्याणकारी योजना व विविध सेवा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी 'सेवा संकल्प अभियान' गांभीर्याने, नियोजनबद्ध व परिणामकारक पद्धतीने राबवावे. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी विषयनिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करून विभागप्रमुखांनी आवश्यक आदेश काढावेत. तसेच जिल्हास्तरावर 'सेवा संकल्प कक्ष' स्थापन करून विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधावा, अशा सूचना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अभियानाच्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी डॉ. जयकुमार आडे, उपजिल्हाधिकारी सीमा अहिरे (रोहयो), कुंदन हिरे (प्रशासन), नगरविकास विभागाच्या उपायुक्त स्नेहल विसपुते, तहसीलदार प्रदीप वर्पे, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यात राज्यात सर्वात अल्प कानी पाऊस

■ उजनी धरण वगळता जिल्ह्यातील इतर प्रकल्पांचा जलसाठा चिंताजनक

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्यात पावसाची फार मोठी ५३.५७ टक्के तूट निघाली आहे. सोलापूर जिल्ह्यात आज पर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यांपैकी अत्यंत कमी पाऊस झाला आहे. पुणे जिल्ह्यातील पावसामुळे उजनी धरण पूर्ण भरले आहे. मात्र जिल्ह्यातील इतर मध्यम आणि लघु प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठा तळाला गेला आहे.सोलापूरमध्ये राज्यात सर्वात जास्त पावसाची तूट निघाली आहे; उजनी धरण आणि नदीवर पुन्हा दोन तास वीजपुरवठ्याचे नियोजन सुरू आहे. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या कार्यालयाकडून टंचाईचा आढावा घेण्यासाठी सोमवार, २१ सप्टेंबर रोजी बैठकीचे नियोजन सुरू आहे. उजनी धरणात ९९.८१ टक्के उपयुक्त जलसाठा आहे. जिल्ह्यातील ५६ लघु प्रकल्पांमध्ये २.८८ टक्के आणि ९० कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमध्ये केवळ ५.७५ टक्के उपयुक्त पाणी शिल्लक आहे. पिंपळगाव (ढा) मध्यम प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा वजा १२.८८ टक्क्यापर्यंत घसरला आहे. जलसाठा आटल्यामुळे जिल्ह्यातील ९ तालुक्यांमधील ५७ गावे आणि २२५ वाड्यांवर पाण्याचे ४३ टँकर सुरू करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनाने शासनाला कळविले आहे.

## विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी संभाजी ब्रिगेड आक्रमक



सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हा परिषदेच्या सीईओंच्या दालनात कचरा फेकण्याचा प्रयत्न संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने करण्यात आल्यावर; पोलिसांच्या मध्यस्थीने चर्चा घडवून आणण्यात आली, विद्यार्थ्यांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले यामुळे संभाजी ब्रिगेड च्या वतीने केले जाणारे आंदोलन स्थगित करण्यात आले.

नेहरू हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत संभाजी ब्रिगेडच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या समस्या तात्काळ सोडवाव्यात, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात कचरा फेकण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी मध्यस्थी करत परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर जिल्हा परिषदेचे सीईओ आणि संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांमध्ये यशस्वी चर्चा झाली. या चर्चेदरम्यान नेहरू हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली. यावर सीईओंनी नेहरू हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. आणि पुढच्या आठवड्यात टेंडर वर सही करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग चे खैरादी यांना दिले. विद्यार्थ्यांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता आणि इतर प्रलंबित समस्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

सीईओंच्या आश्वासनानंतर संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाने दिलेल्या शब्दाची पूर्तता करावी, अशी भूमिका घेतली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी भविष्यातही पाठपुरावा सुरू ठेवण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.

संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले शहराध्यक्ष वैभव गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे योगेश घोडके रोहीत कोकरे, सिध्दाराम फुलारी, महेश हिपळे, सिध्दाराम गुरव, प्रकाश माळी,सुजल कोळी,शहर सचिव अक्षय कांबळे , कुमार गायकवाड आधी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी



# महानगरपालिका आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ सोहळा

## शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

नाशिक : (स. गांवकरी)

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देतानाच त्यांच्यात चांगले संस्कार, कला-क्रीडा कौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि राष्ट्रप्रेमाची भावना रुजविणे आवश्यक आहे. शिक्षक, प्रशासन, लोकप्रतिनिधी, पालक, माजी विद्यार्थी आणि समाजाच्या सहभागातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा गुणवत्तापूर्ण विकास साधता येईल. नाशिक महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थी संख्या आगामी काळात ५० हजारांपुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने भोरे सभागृहात आयोजित आदर्श शिक्षक गुणगौरव सोहळ्यात भुसे बोलत होते. यावेळी उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अमित रंजन, सह आयुक्त स्मिता झगडे, मनपा शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मिता चौधरी, सेवानिवृत्त शिक्षक संजय कळमकर, गटनेते अजय बोरस्ते, शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, पुरस्कारार्थी शिक्षकांचे कुटुंबीय उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले की, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सक्षम करणे हे अत्यंत महत्त्वाचे सामाजिक कार्य आहे. महापालिका शाळांमधील गुणवत्तावाढीबरोबरच पालकांचा विश्वास संपादन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत भाषा, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. कोल्हापूर, गडचिरोली, वाशिम तसेच पुणे जिल्ह्यातील विविध शाळांच्या यशस्वी प्रयोगांची उदाहरणे देताना सांगितले की, शिक्षकाने निर्धार केला आणि त्याला लोकप्रतिनिधी व प्रशासनाची साथ मिळाली, तर शाळेचे चित्र बदलू शकते.

## राज्यात ३० हजार शिक्षकांची भरती प्रक्रिया

राज्यात सुमारे ३० हजार शिक्षकांची भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने सुरू असून, पहिल्या टप्प्यात १३ हजार शिक्षकांची ‘पवित्र पोर्टल’च्या माध्यमातून विना-मुलाखत नियुक्ती करण्यात येत आहे. काही अनुदानित संस्थांनीही विना-मुलाखत शिक्षक नियुक्तीस सहमती दर्शविली आहे. अंतर्गत वाद असलेल्या संस्थांमध्ये शासनामार्फत थेट शिक्षक नियुक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

# महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनची ६९ वी वार्षिक सभा उत्साहात!

## राज्यभरातील पदाधिकारी व सभासदांची उपस्थिती; पेन्शनधारकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा!

पुणे : (स. गांवकरी)



महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन पुणेची ६९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सदाशिव पेठ येथील उद्यान मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. राज्यातील विविध जिल्हे व तालुक्यांतील अध्यक्ष, पदाधिकारी तसेच सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे सहसंचालक, कोषागार पुणे कार्यालयाचे देवराम शेळके, अध्यक्ष एन. डी. मारणे, कार्याध्यक्ष वसंतराव वाबळे, सरचिटणीस सुभाष पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते गणेशपूजन करण्यात आले. त्यानंतर दिवंगत मान्यवर व ज्ञात-अज्ञात सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सरचिटणीस सुभाष पवार यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त, सन २०२५-२६ चा आर्थिक व लेखापरीक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवाल तसेच सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक यावर चर्चा करून सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### डॉ. विलास पांगरकर यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट

संभाजीनगर (स. गांवकरी) : संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उपोषण सोडल्यानंतर संभाजी नगर येथे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर,संघटक परमेश्वर नलावडे पाटील यांनी ज्यांचे पाटील यांची सदिच्छा भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. यावेळी गॅलेक्सी हॉस्पिटल चे डॉ विनोद चौरवे यांच्या कडून जरांगे पाटलांच्या तब्येतीची माहिती जाणून घेतली. तसेच गॅलेक्सी हॉस्पिटल चा आज वर्धापन दिन असल्याने डॉक्टर विनोदी यांना शुभेच्छा दिल्या.



### वूशूच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत MJS कॉलेजचा दबदबा

श्रीगोंदा (स. गांवकरी) : जामखेड येथील ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १६ सप्टेंबर रोजी झालेल्या शालेय जिल्हास्तरीय वूशू स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत चार सुवर्णपदकांसह एकूण सहा पदके पटकावली. या यशाच्या जोरावर महाविद्यालयाच्या सहा खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात कृष्णा वायकर (७० किलो) व सार्थक काळे (८० किलो) यांनी प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकावर नाव कोरले. प्रभू जामदार (६० किलो) व सार्थक खेतमाळीस (९० किलो) यांनी द्वितीय क्रमांक मिळवून रौप्यपदकाची कमाई केली. तर १७ वर्षांखालील मुलांच्या गटात वेदांत भापकर (६५ किलो) व प्रज्वल ढवळे (८० किलो) यांनी प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदके जिंकली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे सहाही खेळाडूंना विभागीय स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी आमदार बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ व डॉ. नितीन थोरात, कनिष्ठ उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे तसेच विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल, पालक सुनील ढवळे आणि प्रशिक्षक ओम पांढरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### महाराजा कॉलेजचा तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत डंका



श्रीगोंदा (स. गांवकरी) : परिक्रमा शैक्षणिक संकुल, काष्टी येथे १७ व १८ सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या मल्लांनी दमदार कामगिरी करत तब्बल १७ खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. महाविद्यालयाच्या २० खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. त्यापैकी विविध वयोगट आणि प्रकारांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत १ ते ३ ऑक्टोबर २०२६ दरम्यान त्रिमूर्ती संकुल, नेवासा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड निश्चित केली. १७ वर्षे ग्रीको-रोमन गटात रोहित पवार (५५ कि.ग्रॅ.), सार्थक काळे (७१ कि.ग्रॅ.) आणि वेदांत लोखंडे (८० कि.ग्रॅ.) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षे फ्री-स्टाईल गटात ओम गावडे (८० कि.ग्रॅ.) प्रथम, तर अथर्व लोणारी (५५ कि.ग्रॅ.) द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला. १९ वर्षे ग्रीको-रोमन गटात समद सय्यद (५५ कि.ग्रॅ.), कार्तिक गोरखे (६० कि.ग्रॅ.), कृष्णा वायकर (६३ कि.ग्रॅ.), संदीप गायकवाड (७२ कि.ग्रॅ.), संदेश डफळ (७७ कि.ग्रॅ.), शंतनू धुमाळ (८२ कि.ग्रॅ.) आणि सार्थक काळे (८७ कि.ग्रॅ.) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. १९ वर्षे फ्री-स्टाईल मुलांच्या गटात संस्कार पवार (७० कि.ग्रॅ.), अतिक लांबकाने (७९ कि.ग्रॅ.) आणि हर्षवर्धन होले (८६ कि.ग्रॅ.) यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मुलींच्या फ्री-स्टाईल गटात समीक्षा जाधव (५३ कि.ग्रॅ.), कोमल जाधव (५५ कि.ग्रॅ.) आणि मानसी धावडे (५७ कि.ग्रॅ.) यांनी सुवर्ण कामगिरी नोंदवत जिल्हास्तरीय स्पर्धेचे तिकीट मिळवले. या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, कनिष्ठ उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# मोठी कारवाई; वाहन चोरीचे ५ गुन्हे उघडकीस

ठाणे : (स. गांवकरी)

मुंब्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दिवा तपास पथकाने वाहन चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करत मोठी कारवाई केली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयिताचा शोध घेत पोलिसांनी मुंब्रादेवी कॉलनी परिसरातून एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याचा वाहन चोरीच्या पाच गुन्ह्यांशी संबंध असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फॅब्रिकेशन शॉपसमोर पार्क केलेली दुचाकी चोरीला गेल्याप्रकरणी मयूर तुकाराम शिंगाडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान बालकाकडून मुंब्रा पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या पाच वाहन चोरीच्या गुन्ह्यांची उकल झाली. त्याच्याकडून सुमारे २ लाख ५० हजार रुपये किमतीच्या ५ मोटारसायकल




व स्कुटी जप्त करण्यात आल्या आहेत. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा तपास पथकाने केली. या कारवाईमुळे गु.र.नं. १३४१/२०२६, १४६४/२०२६, १५२२/२०२६, १५६१/२०२६ आणि १५९१/२०२६ हे पाच गुन्हे उघडकीस आले. नागरिकांनी वाहने सुरक्षित ठिकाणी व सीसीटीव्हीच्या निगराणीखाली पार्क करावीत, तसेच वाहनांना जीपीएस प्रणाली बसवून घ्यावी, असे आवाहन मुंब्रा पोलिसांनी केले आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहपोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे, पोलीस उपआयुक्त बाळासाहेब पाटील, सहा. पोलीस आयुक्त संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड, पोनि शरद कुंभार, पोनि प्रशांत पाटील यांच्या सूचनेनुसार सपोनि शिवाजी हुलगे व तपास पथकाने केली. नागरिकांनी वाहने सुरक्षित ठिकाणी पार्क करून जीपीएस बसवून घ्यावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची शैक्षणिक सुवर्णसंधी

ठाणे : (स. गांवकरी)




- पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्णपणे ऑनलाईन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने (य.च.म.मुक्त विद्यापीठ) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांसाठी मोठी शैक्षणिक संधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) मान्यतेनुसार बी.कॉम, बीसीए हे पदवी अभ्यासक्रम, तसेच एमसीए आणि एमबीए हे पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश क्षमतेची कोणतीही मर्यादा नसल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी दिली. या ऑनलाइन शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना घरबसल्या अभ्यास करता येणार असून, प्रत्येक विषयासाठी नियोजनबद्ध व्हिडीओ व्याख्याने उपलब्ध करून दिली जाणार आहेत. प्रत्येक व्हिडीओनंतर प्रश्नावली सोडवावी लागणार असून, त्यातून विषयाचे आकलन तपासले जाणार आहे. तसेच १०० विद्यार्थ्यांमागे एक मेंटॉर नियुक्त केला जाणार असून, व्हॉट्सअॅप ग्रुप आणि ई-मेलद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाईल. अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाइन प्रॉक्टर-बेस्ड पद्धतीने घेण्यात येणार आहेत.

# दिव्यातील अनधिकृत फेरीवाल्यांवर तात्काळ कारवाई करा

ठाणे, दिवा : (स. गांवकरी)

- शैलेश पाटील, नगरसेवक
- अन्यथा महासभेच्या दिवशी तीव्र आंदोलनाचा इशारा



दिवा शहरातील प्रमुख रस्त्यांवर अनधिकृत फेरीवाले आणि हातगाड्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या समस्येकडे प्रभाग समिती प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, तिसऱ्यांदा निवडून आलेल्या सत्तारूढ पक्षाच्या नगरसेवकाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दिवा स्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, दिवा-आगासन रेल्वे फाटक तसेच मुंब्रादेवी कॉलनी परिसरातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृत अतिक्रमण वाढले असून, त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे नगरसेवकांनी पत्रात नमूद केले आहे. या कोंडीचा फटका महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि स्कूलबसला बसत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. प्रभाग समितीतील काही अधिकारी व कर्मचारी अनधिकृत फेरीवाले आणि हातगाडीवाल्यांकडून ‘हप्ते’ घेत असल्याचा गंभीर आरोपही पत्रातून करण्यात आला आहे. या प्रकाराचे पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा नगरसेवकांनी केला आहे. अनधिकृत फेरीवाले व हातगाड्यांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली असून, कारवाई न झाल्यास ऑक्टोबर २०२६ मध्ये होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या दिवशी नागरिकांना सोबत घेऊन महापालिका सभागृहाबाहेर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

# डोहोळे ग्रामपंचायत व खडवली मातोश्री वृद्धाश्रमात विशेष उपक्रम

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पंचायत समिती भिवंडी अंतर्गत येणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे ‘सेवा संकल्प अभियान’, ‘स्वच्छता ही सेवा अभियान’ तसेच ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा’ शुभारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत एल. पुलकुंडवार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव (भा.प्र.से.) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप, मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन, घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट तसेच ‘आशीर्वादाचा दिवा’ या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ग्रामपंचायत स्तरावर उल्लेखनीय काम केल्याबद्दल ग्रुप ग्रामपंचायत डोहोळेचे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांचा ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत एल. पुलकुंडवार यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान,सेवा संकल्प अभियानांतर्गत खडवली येथील मातोश्री वृद्धाश्रमास



भेट देऊन अभियानाचा विशेष उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या, गरजा जाणून घेतल्या तसेच विविध शासकीय योजनांची माहिती दिली यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून वृद्धाश्रमास भेट देण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. वृद्ध नागरिकांना भेटून त्यांच्याशी संवाद साधणे हा या अभियानातील संवेदनशील आणि महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध प्रशासकीय योजना व नागरिकाभिमुख सेवांबाबत जनजागृती करून ज्येष्ठ नागरिकांना पात्रतेनुसार शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

वृद्ध नागरिकांनी उपलब्ध शासकीय योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, तसेच आवश्यक सेवांसाठी प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. समाज कल्याण विभागाच्या प्रमुख उज्वला सपकाळे यांनी यावेळी वृद्धाश्रमातील उपस्थितांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. वृद्धाश्रम ही आजच्या काळातील एक महत्त्वाची गरज बनत असल्याचे नमूद करताना, मातोश्री वृद्धाश्रमात आल्यानंतर येथे कुटुंबातील सदस्यांसारखे आपुलकीचे वातावरण जाणवत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देत, पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सेवा संकल्प अभियानांतर्गत मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत ‘आशीर्वादाचा दिवा’ प्रज्वलित करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवातून आणि आशीर्वादातून समाजाला प्रेरणा मिळते, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि प्रशासनाची सेवा यांचा संगम घडवत, त्यांच्या जीवनात आपुलकी, सन्मान आणि सुरक्षिततेचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून शासकीय योजना व सेवा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासोबतच ज्येष्ठ नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या गरजा समजून घेण्यावर भर देण्यात येत आहे.

# ‘हर हर महादेव’च्या जयघोषात १४ ज्योतिर्लिंगांचा देखणा धार्मिक देखावा

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

‘हर हर महादेव’च्या जयघोषात देशभरातील १४ ज्योतिर्लिंग मंदिरांचे प्रतिकात्मक दर्शन घडविणारा आकर्षक देखावा धर्मभूषण अॅड. दिलीप ठाकूर यांच्या निवासस्थानी महालक्ष्मीसमोर साकारण्यात आला आहे. श्रद्धा, कल्पकता आणि कलात्मकतेचा सुंदर संगम असलेल्या या देखाव्याला महिला भाविकांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

भारतात भगवान शिवाची १२ ज्योतिर्लिंगे प्रचलित मानली जातात. मात्र नागेश्वर ज्योतिर्लिंगाबाबत गुजरातमधील द्वारका तसेच महाराष्ट्रातील औंढा नागनाथ या दोन्ही ठिकाणांचा उल्लेख केला जातो. त्याचप्रमाणे वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाबाबत झारखंडमधील



देवघर आणि महाराष्ट्रातील परळी वैजनाथ या दोन्ही स्थानांचा उल्लेख आढळतो. त्यामुळे या परंपरेनुसार १४ ज्योतिर्लिंगांच्या तीर्थक्षेत्रांचा समावेश करून हा विशेष देखावा साकारण्यात आला आहे. अॅड. दिलीप ठाकूर यांनी या सर्व १४ ज्योतिर्लिंगांचे प्रत्यक्ष दर्शन घेतले असून, त्याच संकल्पनेतून यंदा सर्व ज्योतिर्लिंग मंदिरांचे प्रतिकात्मक रूप एकाच ठिकाणी उभारण्यात आले आहे.

या देखाव्यात गुजरातमधील प्रभास पाटण येथील सोमनाथ, आंध्र प्रदेशातील श्रीशैलम येथील मल्लिकार्जुन, मध्य प्रदेशातील उज्जैन येथील महाकालेश्वर, मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील ओंकारेश्वर, उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील केदारनाथ, महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर, उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील काशी विश्वनाथ, महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, झारखंडमधील देवघर येथील वैद्यनाथ, गुजरातमधील द्वारका येथील नागेश्वर, तमिळनाडूमधील रामेश्वरम येथील रामेश्वर, महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ येथील घृष्णेश्वर, महाराष्ट्रातील हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ आणि महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ या १४ तीर्थक्षेत्रांच्या मंदिरांचे प्रतिकात्मक दर्शन घडविण्यात आले आहे.

देखाव्याची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी, मंदिरांच्या आकर्षक प्रतिकृती आणि भक्तिमय वातावरणामुळे भाविकांचे लक्ष वेधले जात आहे. देशाच्या विविध भागांत असलेली शिवतीर्थे एका छोटेखानी धार्मिक विश्वाच्या रूपात नांदेडमध्ये पाहण्याची संधी भाविकांना मिळत आहे. त्यामुळे विशेषतः महिला भाविकांमध्ये या देखाव्याबद्दल मोठी उत्सुकता असून, दर्शनासाठी मोठ्या संख्येने महिला येत आहेत.

धर्मभूषण अॅड. दिलीप ठाकूर यांच्या निवासस्थानी दरवर्षी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक विषयांवर आकर्षक देखावे साकारण्याची परंपरा आहे. यापूर्वी येथे अमरनाथ गुहेचा देखावाही साकारण्यात आला होता. दरवर्षी नवीन संकल्पना, आकर्षक सजावट आणि कल्पक मांडणीच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. यंदाचा १४ ज्योतिर्लिंगांचा देखावा या परंपरेतील विशेष आकर्षण ठरला आहे. शनिवारी दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा देखावा नागरिक आणि भाविकांसाठी खुला राहणार आहे. शिवभक्तांनी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन या अनोख्या धार्मिक देखाव्याचे दर्शन घ्यावे, असे आवाहन माजी नगरसेविका जयश्री दिलीपसिंह ठाकूर यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २७६ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार दि. १९ सेप्टेंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय साधत सांस्कृतिक वारसा जपावा : उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन

### पुणे फेस्टिव्हलच्या ३८ व्या पर्वाचे उपराष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन; ज्येष्ठ कलाकार मोहन जोशी यांना 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान



पुणे (समर्थ गांवकरी)

परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधत विकासाकडे वाटचाल करताना समृद्ध सांस्कृतिक वारसा, भाषा, कला, परंपरा आणि मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासासोबत सांस्कृतिक मुळांशी नाते दृढ ठेवणे ही विकसित भारताची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

श्री गणेश कला–क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे पुणे फेस्टिव्हलच्या ३८ व्या पर्वाचे उद्घाटन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार हेमा मालिनी, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मीरा सुरेश कलमाडी आदी उपस्थित होते.

यावेळी उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या हस्ते ज्येष्ठ कलाकार मोहन जोशी यांना 'पुणे फेस्टिव्हल जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

पुण्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक योगदानाचा गौरव करतांना उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी पुणे ही राज्याची सांस्कृतिक राजधानी असल्याचे सांगितले. ते म्हणाले, पुणे फेस्टिव्हलने कला, संस्कृती, संगीत, नृत्य, साहित्य, क्रीडा आणि पर्यटन क्षेत्राला एकत्र आणत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध देशांतील कलाकार, पर्यटक, प्रतिनिधी आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून सांस्कृतिक देवाणघेवाणीला चालना मिळते. यंदाच्या महोत्सवात २१ देशांतील विद्यार्थी सहभागी झाले हे विविध श्रद्धा, संस्कृती आणि परंपरांचा आदर ही भारताच्या सांस्कृतिक जीवनाची वैशिष्ट्ये असल्याचे उपराष्ट्रपतींनी नमूद केले.

महिलांना कला, सर्जनशीलता आणि प्रतिभा सादर करण्यासाठी पुणे फेस्टिव्हलने व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून अशा उपक्रमांमुळे महिलांचा आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाला चालना मिळते. पुणे फेस्टिव्हलशी संबंधित महिला पदाधिकाऱ्यांचा उल्लेख करत त्यांनी वैयक्तिक दुःखावर मात करून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिलांचे कौतुक केले.

विकासाचा अर्थ केवळ आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, आर्थिक वाढ किंवा सकल देशांतर्गत उत्पादनातील वाढ एवढाच मर्यादित नसून संस्कृती, भाषा, परंपरा आणि कलांचे संवर्धनही त्याचा अविभाज्य भाग आहे. आधुनिक शहरे उभारताना त्यांचा सांस्कृतिक आत्मा जपणे, नव्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देतानाच परंपरेचा सन्मान करणे आणि विकासाचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे, असे उपराष्ट्रपतींनी सांगितले.

'विकसित भारत' ही संकल्पना सर्वसमावेशक, समताधिष्ठित आणि सांस्कृतिक वारशाच्या मुळांशी जोडलेली असावी. प्रत्येक प्रदेश, समाजघटक आणि नागरिकाला विकासप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळावी. पुणे फेस्टिव्हलसारखे महोत्सव सांस्कृतिक वारसा जगासमोर मांडतानाच स्थानिक कलाकार, पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला संधी उपलब्ध करून देतात, असे श्री. राधाकृष्णन यांनी नमूद केले.

## एसटीच्या सवलती प्राप्त प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रियेत बदल

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) एनसीएमसी कार्ड प्रकल्पांतर्गत अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांसाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. प्रवाशांना सवलतीचा लाभ अधिक सुलभपणे मिळावा यासाठी महामंडळाने काही महत्त्वाचे बदल केले असून, संबंधित लाभार्थ्यांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

बायोमेट्रिक जुळत नसल्यास आधार ओटीपीचा पर्याय

ज्या अमृत ज्येष्ठ नागरिक लाभार्थ्यांच्या बायोमेट्रिकमध्ये बोटांचे ठसे जुळत नाहीत, अशा लाभार्थ्यांसाठी २१ सप्टेंबर २०२६ पासून आधारकार्ड संलग्न भ्रमणध्वनी क्रमांकावर प्राप्त ओटीपीच्या आधारे एनसीएमसी कार्डची नोंदणी करता येणार आहे.

त्यामुळे बायोमेट्रिक प्रमाणीकरणात अडचण येणाऱ्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हरवलेले किंवा चोरीला गेलेले कार्ड पुन्हा मिळणार

२१ सप्टेंबरपासून हरवलेले अथवा चोरीला गेलेले एनसीएमसी कार्ड ब्लॉक करून रु. १९९ शुल्क भरून नव्याने नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना २५ सप्टेंबरपासून कार्ड वितरण

१९ सप्टेंबरपर्यंत एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना २५ सप्टेंबर २०२६ पासून कार्ड वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

क्यूआर कोड पावतीद्वारे सवलतीचे तिकीट

१६ सप्टेंबरपासून एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी करणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांना क्युआर कोड असलेली पावती देण्यात येणार आहे. ही पावती एसटीच्या ईटीआयएम मशीनवर स्कॅन केल्यानंतर संबंधित सवलतधारकाला सवलतीचे तिकीट मिळणार आहे. ही नोंदणी पावती ३० दिवसांपर्यंत ग्राह्य राहणार आहे. दरम्यान, नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांनी ३० दिवसांच्या आत एनसीएमसी कार्ड क्टीव्ह करून त्यामध्ये टॉप–अप करणे आवश्यक आहे. त्यामुळे सवलतीचा प्रवास अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी लाभार्थ्यांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करावी.

सर्व सवलतधारकांनी तातडीने एनसीएमसी नोंदणी करावी*

एसटी प्रवासातील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी सर्व संबंधित सवलतधारक लाभार्थ्यांनी तात्काळ एनसीएमसी कार्ड नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून सवलतीच्या प्रवासाची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या दृष्टीने एसटी महामंडळाकडून ही कार्यवाही करण्यात येत आहे.




नवी मुंबई.. महाराष्ट्राचे सर्वमान्य हक्काचे व्यासपीठ दैनिक समर्थ गांवकरी मुंबई कार्यालयामध्ये शंकर किसन मोरे नवी मुंबई मा .पाणी पुरवठा मल निसारण सभापती यांचा शाल मंचर भगवान टोपी टॉवेल दैनिक समर्थ गावकरी अंक देऊन त्यांचा सन्मान करतांना र् मुंबई विभागीय संपादक दशरथ चव्हाण व पदाधिकारी उपस्थित होते

## मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून ग्रामीण रुग्णालयाचे विस्तारीकरण

### घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात १०० बेडची विस्तारित इमारत

संगमनेर (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील नागरिकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळावा याकरता तत्कालीन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयामध्ये १०० बेडची अत्याधुनिक इमारत उभी २०२२ मध्ये प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. त्या माध्यमातून व त्यांच्या पाठपुराव्यातून घुलेवाडी इमारतीचे काम सुरू असल्याचे जिल्हा परिषद सदस्य सिताराम राऊत यांनी म्हटले आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात सिताराम राऊत यांनी म्हटले आहे की लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यातील नागरिकांना आरोग्याच्या अत्याधुनिक दर्जेदार सुविधा मिळावा याकरता आपल्या महसूल मंत्री पदाच्या काळामध्ये घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयामध्ये १०० बेडचे नवीन रुग्णालय मंजूर केले याकरता १३ ऑगस्ट २०२२ मध्ये या कामाला महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात प्रशासकीय मान्यता मिळवली होती. त्यानंतर आमदार सत्यजित तांबे यांनीही हे रुग्णालय अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे होण्यासाठी सातत्याने राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्या माध्यमातून हे रुग्णालय उभे राहत आहे.

घुलेवाडी ग्रामस्थांनी ग्रामीण रुग्णालयासाठी ही जागा उपलब्ध करून दिली तेव्हा या ठिकाणी अद्यावत रुग्णालय व्हावे अशी मागणी केली होती. त्याच वेळेला भविष्यात या ठिकाणी आपण जिल्हा रुग्णालय करू असे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी दिले होते .व तदनंतर २०२२ मध्ये या



ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयाला त्यांनी पाठपुरावा करून मान्यता दिली.

संगमनेर शहरामध्ये महिलांसाठी स्वतंत्र हॉस्पिटल व्हावे. याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनीच पाठपुरावा केला आहे. २०20 मध्ये या कामालाही मंजुरी मिळाली होती. घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाचा चेहरा मोहरा बदलताना या ठिकाणी प्रशस्त जागेवर नवीन १०० बेडचे अत्याधुनिक रुग्णालय उभे करण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला आहे.

## पारनेर शहराच्या रस्ते विकासाला मिळणार गती; १.२० कोटींच्या पाच कामांचे रविवारी भूमिपूजन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पारनेर शहरातील रस्ते विकासाला आता चालना मिळणार असून, नगरपंचायत हद्दीतील विविध भागांमध्ये तब्बल १ कोटी २० लाख रुपयांच्या पाच विकासकामांचा शुभारंभ रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी होणार आहे. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते सायंकाळी ६ वाजता तिरकळ मळा, पारनेर येथे भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी ही माहिती दिली.



नगरपंचायत क्षेत्रातील नागरी सेवा व सुविधा कामे २०२५–२६ तसेच विशेष रस्ता अनुदान २०२५–२६ अंतर्गत मंजूर झालेल्या या कामांमुळे शहरातील विविध भागांतील रस्ते सुविधांमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

प्रभाग क्रमांक २ :

– वैद्य वस्ती ते कान्हूर रस्ता डांबरीकरण – २० लाख रुपये (विशेष रस्ता अनुदान).

या पाच कामांसाठी एकूण १ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. काँक्रिटीकरण आणि डांबरीकरणाच्या माध्यमातून संबंधित परिसरातील नागरिकांची दळणवळणाची सुविधा अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या रस्त्यांच्या कामांचा समावेश

प्रभाग क्रमांक ५ :

कान्हूर रोड ते सतीश वैद्य वस्ती रस्ता काँक्रिटीकरण – २० लाख रुपये.

कान्हूर रस्ता ते भाऊसाहेब पुजारी रस्ता काँक्रिटीकरण – २० लाख रुपये.

संगमेश्वर मंदिर ते पारनेरकर महाराज बाग रस्ता डांबरीकरण – २० लाख रुपये.

## कासार परिवाराचा 'वृक्षमय हरित' गणेशोत्सव; पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश!







संगमनेर खुर्द (समर्थ गांवकरी)

दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने आयोजित 'माझा बाप्पा – आदर्श गणेश सजावट स्पर्धा २०२६' अंतर्गत धांदरफळ बुद्रुक येथील दत्ता कासार परिवाराच्या 'स्वप्नपूर्ती मोरया श्री गणेशोत्सवा'चे गणेश सजावट परीक्षण व महाआरती उत्साहात पार पडली.

यावेळी दैनिक समर्थ गांवकरीचे मुख्य संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा संपर्कप्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, संगमनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय गोपाळे, रामेश्वर देवस्थानचे खजिनदार वसंत वाकचौरे, व्यवस्थापक डॉ. संजय थोरात यांच्यासह राजेंद्र गीते, विनोद वाकचौरे, सचिन काळे, मीना काळे, सचिन कासार, संगीता कासार, सुनीता कासार, भामाबाई कासार, सुनील बिडकर, ओम कासार, साईराज कासार आदी उपस्थित होते.

धांदरफळ बुद्रुक येथील सामाजिक कार्यकर्ते तथा रामेश्वर देवस्थानचे कार्यकारी सचिव आणि स्वदेश उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी दत्तात्रय कासार यांनी यंदाचा गणेशोत्सव 'वृक्षमय, हरितमय आणि पर्यावरण संवर्धन' या संकल्पनेतून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांचे सुपुत्र मयूर कासार यांनी आकर्षक मयूर देखावा साकारत श्री गणेशाला प्रिय असलेल्या जास्वंद, चाफा, शमी, गुलाब, जरबेरा, केवडा आदी वनस्पतींची लागवड केली आहे.

यामुळे कासार परिवाराचा गणेशोत्सव केवळ सजावटीपुरता मर्यादित न राहता वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा ठरला आहे.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजात पर्यावरणाबाबत जनजागृती करण्याचा कासार परिवाराचा उपक्रम उपस्थितांनी कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले की, गणेशोत्सव हा भक्ती, आनंद आणि एकतेचा उत्सव आहे.

लोकमान्य टिळकांनी समाजात एकोपा निर्माण व्हावा या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाला चालना दिली. आज गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. कासार परिवाराने वृक्षारोपणाला गणेशोत्सवाची जोड देऊन पर्यावरण संवर्धनाचा दिलेला संदेश कौतुकास्पद असून, हा हरित गणेशोत्सव परिसरासाठी ऑक्सिजनची शिदोरी निर्माण करणारा उपक्रम ठरेल, असे त्यांनी सांगितले.



# थोडक्यात पण महत्त्वाचे

## घरगुती बाप्पाचे धुमधडाक्यात वाजत गाजत बाप्पाला निरोप



संगमनेर खुर्द (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्यामध्ये बहुतांश ग्रामीण भागातील घरगुती गणपती बाप्पा चे विधिवत पूजा अर्चा, महा आरती व ढोल ताशांच्या गजरामध्ये गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरुवात झाली आहे.

दिवस तीन,दिवस पाच दिवस व सात दिवसाचे गणपती बाप्पाचे विसर्जनासाठी कवडे कुटुंबियांच्या वतीने घरगुती गणपती बाप्पाचा भव्य देखावा करण्यात आला होता.

लोकमान्य टिळकांनी समाजामध्ये चांगल्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी, धार्मिक, अध्यात्मिक, कौटुंबिक, कुटुंब व्यवस्था, सामाजिक सलोखा निर्माण व्हावा यासाठी त्या काळात गणेशोत्सव सुरू करण्यात आला होता... परंतु सद्य परिस्थितीमध्ये एकत्र कुटुंबातील सदस्य नोकरी निमित्त बाहेरगावी असतात कुटुंबाने देखील गणेशोत्सव काळामध्ये एकत्र येऊन आपल्या कुटुंब व्यवस्थेसाठी प्रेम सलोखा टिकून राहावा यासाठी निमगाव खुर्द येथील सामाजिक कार्यकर्ते बाजीराव कवडे यांच्या कुटुंबाने, नोकरी व उद्योग व्यवसायासाठी बाहेर गेलेल्या भावंडांना एकत्र करत गणपती उत्सव मोठ्या उत्सव साजरा केला.

## तरूणाला मारहाण नगर शहरात भाजपा नगरसेवकासह पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

एका तरूणाला नगरसेवकासह पाच जणांनी शिवीगाळ, धक्काबुक्की करून लोखंडी रॉडने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी मध्यरात्री अहिल्यानगर-पुणे रोडवरील राजश्री हॉटेलसमोर घडल्याचा आरोप आहे. या मारहाणीत जखमी झालेल्या रोहित सुरेश पाथरकर (वय २६, रा. केडगाव) याच्यावर खासगी रूग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पाथरकर यांनी रूग्णालयात उपचार घेत असताना १५ सप्टेंबर रोजी पोलिसांना जबाब दिला आहे. त्यांच्या जबाबानुसार नगरसेवक सागर राजू मुर्तडकर, त्याचा भाऊ सनी मुर्तडकर व आकाश मुर्तडकर तसेच शिवम शिंगटे (रा. वंजारगल्ली, मंगलगेट) आणि गणेश सुंभे (रा. भुतकरवाडी, बालिकाश्रम रोड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाथरकर यांनी दिलेल्या जबाबानुसार, ते व्यवसाय करतात. १४ सप्टेंबर रोजी रात्री दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास पाथरकर हे त्यांचा मित्र अमोल गायकवाड याच्यासोबत कारने नगर-पुणे रोडवरील राजश्री हॉटेलसमोर गेले होते. मालाचे पैसे घेण्यासाठी देवा सुंभे यांच्याकडे त्यांचा व्यवहार होता. देवा सुंभे यांनी पैसे दिल्यानंतर तेथून निघून गेले. त्यानंतर पाथरकर व त्यांचा मित्र अमोल घरी जाण्यासाठी निघाले असताना सागर मुर्तडकर हा कारमधून तेथे आला. पाथरकर यांच्या जबाबानुसार, मुर्तडकर याने त्यांच्याकडे पाहून शिवीगाळ केली. याबाबत विचारणा केली असता धक्काबुक्की करून रॉडने मारहाण केल्याचा आरोप आहे. दरम्यान, तेथे उपस्थित असलेल्या गणेश सुंभे, शिवम शिंगटे, सनी मुर्तडकर व आकाश मुर्तडकर यांनी पाथरकर मारहाण केल्याचे जबाबात म्हटले आहे.

## डॉ रमेश सावंत याना एनपीडब्लूए आयडॉल अवॉर्ड प्रदान



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

येथील डॉ विखे पाटील फार्मसी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ रमेश सावंत यांना नॅशनल फार्मसी वेलफेअर असोसिएशन (NPWA), इंडिया यांच्या वतीने फार्मसी शिक्षण व संशोधन क्षेत्रातील उत्कृष्ठ योगदान आणि समर्पित सेवेबद्दल मा.मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते पुणे येथे NPWA आयडॉल अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला.यावेळी असो अध्यक्ष डॉ.सचिन कोतवाल,सेक्रेटरी डॉ.संपत नवले,कार्यकारी अध्यक्ष प्रा.प्रवीण जवळे यांच्यासह अनेक मान्यवर व प्राध्यापक उपस्थित होते. त्यांनी फार्मसी शिक्षण आणि फार्मसी क्षेत्रातील आपल्या उत्कृष्ट योगदान आणि समर्पित सेवेबद्दल आयडॉल अवॉर्ड पुरस्कार देण्यात आला आहे.डॉ सावंत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संशोधन आणि मान्यता समिती, फार्मास्युटिकल केमिस्ट्री बोर्ड ऑफ स्टडीज आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. डॉ. सावंत यांच्याकडे ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात औषधनिर्माण उद्योगातील संशोधन आणि विकास विभागात कनिष्ठ अधिकारी म्हणून केली. त्यांच्या नावावर सध्या १०७ शोधनिबंध अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सादरीकरणे, तसेच १० पेटंट्स,५ पुस्तकचे लेखन केले आहे. त्यांनी १११ एम. फार्म.आणि ७ पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे, तर ६ संशोधक त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी. करत आहेत.

# मैदानी खेळ विद्यार्थ्यांना जिद्द, शिस्त व आत्मविश्वास देतात : डॉ. रंगनाथ आहेर

## श्री शिवछत्रपती कुस्ती संकुलात आयोजित तालुका शालेय कुस्ती स्पर्धा



पारनेर (समर्थ गांवकरी)

लोप पावत चाललेल्या पारंपरिक खेळांचे जतन करण्यासाठी शालेय स्तरापासून मैदानी खेळांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कुस्ती हा केवळ शारीरिक ताकदीचा खेळ नसून त्यातून निर्णयक्षमता, संयम, आत्मविश्वास आणि संघर्षाची शिकवण मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत खेळालाही महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुका शालेय कुस्ती स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन श्री शिवछत्रपती कुस्ती संकुल, पारनेर येथे करण्यात आले. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. रंगनाथ आहेर अध्यक्षस्थानी होते. यावेळी ज्येष्ठ नेते बाळासाहेब पठारे, कुंडलिक पठारे, डॉ. संतोष भुजबळ, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, नगरसेवक युवराज पठारे, पै. संदीप कावरे, बापूसाहेब होळकर, डॉ. बाळासाहेब कावरे, नगरसेवक योगेश मते, भूषण शेलार, अशोक चेडे, अर्जुन भालेकर, डॉ. सचिन औटी, सुभाष शिंदे, उद्योजक यशवंत पठारे, निलेश मदने, पै. विष्णू खोसे, पै. गोकुळ शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. आहेर म्हणाले, कुस्ती हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला पारंपरिक खेळ आहे. हा खेळ जिवंत ठेवण्यासाठी शालेय स्तरावर अशा स्पर्धांचे सातत्याने आयोजन होणे गरजेचे आहे. चार भिंतींच्या आत शाळा-महाविद्यालयात विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संस्कार मिळतात; मात्र खऱ्या अर्थाने जीवन कसे जगायचे, हे शिकण्यासाठी खेळाशिवाय पर्याय नाही. कुस्तीमध्ये क्षणाक्षणाला डाव टाकावा लागतो. त्यासाठी योग्य निर्णय घेण्याबरोबरच प्रतिस्पर्ध्याची मानसिकता ओळखून त्यानुसार कृती करावी लागते. हे डावपेच तालमी आणि मैदानातून शिकायला मिळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जिद्द, शिस्त आणि आत्मविश्वासाने विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

स्पर्धेत पारनेर तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले. क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, मार्गदर्शक आणि पालकांचीही मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश चेडे यांनी केले, तर आभार पै. युवराज पठारे यांनी मानले.

> कुस्ती ही आपल्या महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली पारंपरिक क्रीडा संस्कृती आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये उत्तम क्रीडा कौशल्य असून त्यांना योग्य व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. शालेय स्तरावर कुस्ती स्पर्धांचे आयोजन झाल्याने विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळते. पारंपरिक खेळांचे जतन आणि पुढील पिढीपर्यंत त्यांची परंपरा पोहोचविण्यासाठी अशा स्पर्धा सातत्याने आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न राहील.
>
> **-नगरसेवक पै. युवराज पठारे (पारनेर)**

### पारंपरिक कुस्तीच्या जतनासाठी प्रयत्न

पारनेर शहराच्या माध्यमातून पै. युवराज पठारे यांनी कुस्तीसारख्या पारंपरिक खेळाची सातत्याने जपणूक केली असल्याचेही डॉ. आहेर यांनी नमूद केले. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपले क्रीडा कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ मिळते. त्यामुळे पारंपरिक खेळांची पुढील पिढीशी नाळ जोडली जाण्यास मदत होते, असेही यावेळी सांगण्यात आले.

## शेअर मार्केटमध्ये नगर शहरात सीएची १५ लाख २५ हजार रूपयांची फसवणूक

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून चांगला परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत शहरातील एका सनदी लेखापालाची (सीए) १५ लाख २५ हजार रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. अक्षय ज्ञानेश्वर दारकुंडे (वय ३०, रा. पारगाव भातोडी, ता. अहिल्यानगर) असे फसवणूक झालेल्या सनदी लेखापालाचे नाव आहे. त्यांनी बुधवारी (१६ सप्टेंबर) दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिकेत संजय वाघमारे (वय २५, रा. महेशनगर, बाराबाभळी) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे. फिर्यादी दारकुंडे हे सनदी लेखापाल असून सावेडी परिसरात त्यांचे कार्यालय आहे. त्यांच्या मित्रामार्फत सन २०२२ मध्ये अनिकेत वाघमारे याच्याशी ओळख झाली. अनिकेत शेअर मार्केटमध्ये काम करीत असल्याचे सांगत असल्याने त्याने काही दिवस दारकुंडे यांच्या कार्यालयात ये-जा केली. यावेळी आपण चांगले शेअर ट्रेडिंग करीत असल्याचे सांगून त्याने विश्वास संपादन केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, सप्टेंबर २०२३ ते ८ जानेवारी २०२४ या कालावधीत अनिकेतने वैयक्तिक अडचण असल्याचे सांगत दारकुंडे यांच्याकडून वेळोवेळी रोख स्वरूपात ६ लाख २५ हजार रूपये घेतले. हे पैसे लवकर परत देण्याचे सांगून त्याने नोटरी करून दिली तसेच सुरक्षेसाठी चेक दिले.

## गोधेगावयेथे महान तपस्वी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांचा जन्म दिन सोहळा साजरा

### साधूंचा अवतार व त्यांची प्रत्येक क्रिया ही जगाच्या उद्धारासाठी-स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज

नेवासा (समर्थ गांवकरी)

श्री गुरूदेव दत्त पीठ देवगड क्षेत्राचे उद्धारक महान तपस्वी श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबा यांची जन्मभूमी असलेल्या नेवासा तालुक्यातील गोधेगाव येथे सद्गुरू किसनगिरी बाबांचा जन्म दिन देवगड गुरूदेव दत्त पिठाचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. साधूंचा अवतार व त्यांची प्रत्येक क्रिया दुःखाच्या निवारणासाठी जगाच्या उद्धारासाठी असते असे प्रतिपादन स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलतांना केले. श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांचे सेवाधारी भक्त मंडळ वगोधेगावग्रामस्थ यांच्या उत्कृष्ट नियोजनात जन्मदिन सोहळयाचे आयोजन गुरूवारी करण्यात आले होते.जन्मदिनाच्या निमित्त श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या पादुकांचे व जन्मस्थानाचे पूजन गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबा व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य कांतागुरू जोशी यांनी केले. श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबांच्या जन्म दिनाच्या निमित्ताने देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे कीर्तन झाले. त्यांनी सद्गुरू किसनगिरी बाबांचा महिमा व कार्य आपल्या कीर्तनातून विषद केले.प्रत्येक माणसात आणि प्राणिमात्रांमध्ये देवांचे अस्थित्व असते ही शिकवण त्यांनी जगाला दिली.संतांना जात नसते संतत्व हे त्यांनी मानले असल्याने प्राणिमात्रांवर ही दया करा ही सद्गुरू किसनगिरी बाबांची शिकवण प्रत्येकांनी अंगीकारावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी बोलतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी दिलेल्या भेटी प्रसंगी उपस्थित भाविकांना संदेश दिला की सद्गुरू किसनगिरी बाबांच्या कार्याची महती व या परिसराचे नाव देशभर गेले असून संत परंपरेत अवतीर्ण होऊन त्यांनी भक्तांना सुख व समाधान प्राप्त करून दिले आहे, आतापर्यंत संत विचाराने सर्व कार्य आम्ही करत आलो आहे, आता हे कार्य पुढे नेण्याची जबाबदारी भावी पिढीचा आधारस्तंभ असलेल्या युवा पिढीला करायचे आहे,किसनगिरी बाबांच्या



कीर्तीचा ध्वज उंचच उंच फडकत रहाण्यासाठी प्रयत्न करा, संतांच्या चरणी विनम्र रहा,संतांबद्दल दुजाभाव ठेऊ नका असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

या प्रसंगी श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा सेवाधारी मंडळाच्या वतीने गुरुवर्य शांतीब्रम्ह श्री भास्करगिरीजी बाबाजी व स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी यांचे संतपूजन करण्यात आले.यावेळी टाकळीभान येथून भक्त परिवाराच्या वतीने पायी दिंडी काढण्यात आली होती या दिंडीचे स्वागत करण्यात आले.जन्मदिन सोहळयाच्या प्रसंगी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित भाविकांना आमटी भाकरी प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## कल्पनांना संशोधनाची जोड; पारनेरच्या विद्यार्थ्यांना ‘अविष्कार’ ची दिशा

### परिसरातील समस्याच बनू शकतात संशोधनाचे विषय : डॉ. खेडकर

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात ‘अविष्कार संशोधन स्पर्धा,विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळे’चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.जयश्री खेडकर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर होते.

डॉ. खेडकर यांनी विद्यार्थ्यांना संशोधन विषयाची निवड, समस्येची मांडणी, माहिती संकलन, विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्याच्या शास्त्रीय पद्धती समजावून सांगितल्या. पाणी, शेती, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतील स्थानिक समस्यांमधून संशोधनाच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.



कार्यशाळेतपोस्टरसादरीकरणाची प्रभावी पद्धत, कमी शब्दांत महत्त्वाचे मुद्दे मांडणे आणि परीक्षकांच्या प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे देण्याचे कौशल्य याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी विद्यार्थ्यांनी पारंपरिक चौकटीबाहेर जाऊन विचार करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला संशोधनाची जोड मिळाल्यास समाजाच्या विविध गरजा पूर्ण होऊ शकतात. संशोधन हे राष्ट्रउभारणीत योगदान देणारे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राहुल डिगीकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शिवाजी पठारे यांनी केले, तर प्रा. समीर दळवी यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी डॉ. सरिता कुंडलीकर, प्रा. आम्रपाली नगरे आणि प्रा. जैनब सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भर उन्हात जामखेडमध्ये दुसर्या दिवशी ही मुस्लिम बांधवांचा पावसासाठी सामूहिक नमाज व दुवा

### बुधवार, गुरुवार व शुक्रवार तीन दिवस नमाज पठण होणार

जामखेड (समर्थ गांवकरी)



जामखेड तालुक्यात पावसाने दडी मारल्याने शेती, पिण्याचे पाणी आणि पशुधनाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. या पार्श्वभूमीवर पावसासाठी जामखेड शहरात मुस्लिम बांधवांनी सामूहिक इस्तिस्का नमाज अदा करून अल्लाहकडे पावसासाठी साकडे घातले. उद्या गुरुवारी व परवा शुक्रवारी पण दुपारी नमाज पठण होणार आहे.भर उन्हात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव एकत्र आले. यावेळी नमाज अदा केल्यानंतर पावसासाठी विशेष दुवा करण्यात आली. हे परवरदिगार, रहमतची बारिश आता फरमा आणि आम्हा सर्वांना या संकटातून वाचव. पशु-पक्षी व मुक्या प्राण्यांवर दया कर, अशा भावनिक शब्दांत पावसासाठी प्रार्थना करण्यात आली.यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने खरीप हंगामावर मोठा परिणाम झाला आहे. पिके पाण्याअभावी अडचणीत आली असून तलाव, विहिरी आणि अन्य जलस्रोतांमधील पाणीसाठाही कमी होत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, नागरिक तसेच पशुधनासाठी परिस्थिती दिवसेंदिवस चिंताजनक बनत आहे.या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाज बांधवांनी तीन दिवस इस्तिस्का नमाज अदा करण्याचा निर्णय घेतला आहे.पावसासाठी सामूहिक दुवा करताना समाजातील सर्व घटकांच्या सुख-समृद्धीसाठी तसेच दुष्काळसदृश परिस्थितीतून लवकर सुटका व्हावी, यासाठी प्रार्थना करण्यात येत आहे.

पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या नागरिकांच्या भावना यावेळी प्रकर्षाने जाणवल्या. आभाळ निरभ्र असले तरी नागरिकांच्या नजरा मात्र काळ्या ढगांच्या प्रतीक्षेत आणि ओठांवर पावसासाठीची दुवा होती.पाऊस पडावा, शेतीला जीवदान मिळावे, पशु-पक्ष्यांची तहान भागावी आणि संपूर्ण परिसरावरील पाणीटंचाईचे संकट दूर व्हावे, यासाठी मुस्लिम बांधवांनी केलेल्या या सामूहिक प्रार्थनेने जामखेडमध्ये धार्मिक श्रद्धेसोबतच माणुसकीचा आणि मुक्या जीवांबद्दलच्या संवेदनशीलतेचा संदेश दिला.

## जेष्ठा गौरी महालक्ष्मीचे नेवासा शहरासह तालुक्यात उत्साहात स्थापना, सुवासींनीनी पंचारती ओवाळून केले स्वागत

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा शहरासह तालुक्यात जेष्ठा गौरी महालक्ष्मीची उत्साहात स्थापना करण्यात आली.यावेळी सुवासिनींनी महालक्ष्मी देवींचे विधीवत पद्धतीने पंचारती ओवाळून व नैवेद्य अर्पण करून पूजन केले.गौराईआली गौराईआली..सोन पावलांनीगौराईआली असे म्हणत घरोघरी झालेल्या आगमनाने व महालक्ष्मीगौराई आरतीच्या निनादाने वातावरण मंगलमय बनले होते.

जेष्ठा गौरी महालक्ष्मीची स्थापना करण्याची लगबग आदल्या दिवशी पासूनच महिला सुवासींनीमध्ये दिसून येत होती,महालक्ष्मीदेवीसाठी लागणारे अलंकार व सजावटीचे साहित्य घेण्यासाठी नेवासा शहरातील बाजार पेठेत गर्दी दिसून येत होती नेवासाफाटा व शहर परिसरासह तालुक्यात ही हेच चित्र दिसून येत होते

जेष्ठा गौरी महालक्ष्मीची स्थापना करतांना घराघरात सुवासिनीमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. महालक्ष्मीच्या स्थापना प्रसंगी शामियान्यासारखा मंडप घालून सजावट करण्यात आली होती तसेच महालक्ष्मीना अलंकार पुष्पांनी सजविले होते.

सुवासीनींनी मनोभावे पूजा करून आपल्या कुटुंबासमवेत आरती केली यामुळे घराघरातील वातावरण मंगलमय झालेले दिसत होते.

महालक्ष्मी देवींना नैवेद्य अर्पण करण्यात आला होता. सुवासिनींनी देखील उपवास धरून व्रत केले होते.

जेष्ठा गौरी महालक्ष्मीना पहिल्या दिवशी साध्या भाजी भाकरीचा नैवेद्य अर्पण करण्यात येतो तर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी रोजी पाचीपक्वान्न याचा नैवेद्य भोजन रूपाने महालक्ष्मीला भोग देण्यात आला.शनिवारी तिसऱ्या दिवशी सायंकाळी महालक्ष्मीचे विसर्जन केले जाणार आहे

शुक्रवारी महालक्ष्मी स्थापनेच्या दिवशी महालक्ष्मीपुढे आरास सजावटीसह आरास करण्यात आली होती ही



आरास पहाण्यासाठी सुवासींनीनी हळदी कुंकुवाच्या निमित्ताने गर्दी केली होती. नेवासा तालुक्यातील ठीकठिकाणी उत्साहपूर्ण वातावरणात जेष्ठा गौरींची स्थापना झाल्याने घरोघरी वातावरण मंगलमय बनले होते.





# भागवत परिवाराचा आधारवड हरपला.. गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील चितळवेढे गावातील कै.उमाजी शंकरराव भागवत यांचे दि.१०-०९-२०२६ रोजी वृद्धापकाळाने देहावसान झाले.

आमचे काका गेले. आमच्या परिवाराचा आधारवड कोसळला. खरंतर वडिलांचे छत्र हरपणे म्हणजे डोक्यावरचे आभाळच नाहिसे होणे आहे. मानवी जीवनात मृत्यू हे अंतिम सत्य आहे.तरीपण काका तुमचे जाणे आमच्या सर्वांच्या मनाला चटका लावून गेले आहे.

खरंतर तर काका वडिलांचे छत्र जोपर्यंत आमचे डोक्यावर होते, तोपर्यंत आमचे जीवनात कोणत्याही प्रसंगाची झळ बसत नव्हती.

वडिलांचे निधन ही जीवनातील कधीच न भरून येणारी पोकळी आहे.

काका, आपण आयुष्यभर स्वतः कष्ट सोसून आम्हा मुला-मुलींचे भविष्य उजळविले. स्वतः चे विचार आणि गरजा नेहमीच दूर ठेवल्या.

तुम्ही केवळ आमचे वडील नव्हता तर एक आदर्श मार्गदर्शक आणि भक्कम असा आधारस्तंभ होते.

वयाच्या वाढत्या टप्प्यातवर तुमचे शरीर जरी थकले होते, तरी तुमचे हास्य, मार्गदर्शन आणि आशिर्वाद आम्हाला जीवन जगण्यासाठी सतत आठवत राहील.

काका, तुम्ही वेळोवळी आम्हाला केलेले मार्गदर्शन,शिकवण आणि संस्कार आमच्या पुढील जीवनप्रवासात नक्कीच प्रेरणा देत राहील.

तुमचे जाणे हे आमच्यासाठी खूपच वेदनादायी आहे.

काका, आम्हाला घडवताना आपण आमचेवर केलेले संस्कार, आणि आदर्श प्रवासाची शिकवण आम्ही सदैव आठवणीत ठेऊ. तसेच तुमचे आदर्श विचार, इतर सर्वांप्रती असणारी सहिष्णुता आणि समाजाप्रती असलेले दातृत्व, ही मौलिक जीवन तत्वे आम्ही सदैव स्मरणात ठेवून तुमच्याच मार्गावर जीवनाची वाटचाल करीत राहाण्याची ग्वाही आपणास देत आहोत, आज यापुढे आपण आमचे बरोबर नाहीत तरीपण तुमचा आशिर्वाद आणि सदिच्छा कायमच आमच्या पाठीशी राहातील.

**शब्दांकन सकंलन...**
**प्रा.किरण भागवत**
**संपादक डॉ. विश्वासराव आरोटे**
**दैनिक समर्थ गांवकरी कळसुबाई शिखरावरून....**

**आपणास आमचेकडुन भावपूर्ण श्रद्धांजली......**
**!! ओम शांती !!**

# लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र' येथे बैठक न लावल्याच्या कारणावरून मारहाण

## जामखेड तालुक्यातील कलाकेंद्रांच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये चर्चा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

मोहा शिवारातील 'लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र' येथे बैठक न लावल्याच्या कारणावरून तब्बल ७ जणांच्या टोळक्याने पान टपरी चालक आणि कला केंद्रातील महिलेला बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ११ सप्टेंबर रोजी रात्री १२:५० वाजताच्या सुमारास फिर्यादी अभिषेक गुलचंद अंधारे (वय २४, रा. मिलिंदनगर, जामखेड) हे आपल्या पान टपरीवर असताना आरोपींनी तेथे येऊन 'बैठक लावा' अशी मागणी केली. मात्र रात्री १ वाजता कला केंद्र बंद करण्याची वेळ झाल्याने अभिषेक यांनी बैठक लावण्यास स्पष्ट नकार दिला. दरम्यान,याच वेळी विशाल मगर याने त्यांच्या गळ्यातील ५४ हजार रुपये किमतीचे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेट जबरदस्तीने हिसकावून पळ काढला.मारहाणीनंतर आरोपींनी कला केंद्रातील खोल्यांच्या काचा आणि खुर्च्यांची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली. परत नादी लागलात तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देऊन परिसरात दहशत पसरवत आरोपी पसार झाले.फिर्यादी अभिषेक गुलचंद अंधारे याच्या तक्रारीवरून जामखेड पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश आघाव हे करीत आहे.





### कलाकेंद्रांना राजकीय पाठबळ कोणाचे?

मोहा शिवारातील 'लक्ष्मी सांस्कृतिक कला केंद्र' येथे बैठक न लावल्याच्या कारणावरून जामखेड तालुक्यातील कलाकेंद्रांच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. संबंधित कलाकेंद्रांमध्ये वारंवार वाद होत असल्याचेही बोलले जात आहे. कलाकेंद्र चालकांकडून राजकीय क्षेत्रातील संपर्काचा वापर करून अवैध धंद्यांना आश्रय दिला जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे या कलाकेंद्रांना नेमके कोणाचे राजकीय पाठबळ आहे? तसेच संबंधित ठिकाणी सुरू असलेल्या गैरप्रकारांची प्रशासनाकडून चौकशी होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# समाज कल्याण अहिल्यानगर उपक्रम

## अकोलेतील'मॉडर्न 'च्या शास्त्र शाखा विद्यार्थ्यांना जात पडताळणी संबंधी मार्गदर्शन

**अकोले (समर्थ गांवकरी)**

येथील मॉडर्न हायस्कूल ज्युनियर कॉलेज मधील उच्च माध्यमिक शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी कागदपत्रे संकलन व त्यासंबंधी आवश्यक बाबींची सखोल माहिती समाज कल्याण विभाग अहिल्यानगर,संशोधक दिलावर सय्यद यांनी दिली. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना जात पडताळणी बाबतची गरज, आवश्यक कागदपत्रांची जुळणी व प्रस्ताव शाळेमार्फतच पाठवण्याचे आवाहन केले.भविष्यातील स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन व माहिती देखील त्यांनी दिली. कार्यक्रमानंतर दिलावर सय्यद यांनी विद्यार्थ्यांसमवेत वृक्षारोपण विद्यालयाच्या प्रांगणात केले. विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण रजत अवसर समाजदूत संगमनेर व संतोष शिंदे समाजदूत अकोले यांनी केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक उपप्राचार्य दीपक जोंधळे यांनी तर सूत्रसंचालन बबन कासार यांनी केले. मान्यवरांचे आभार संदीप भोर यांनी मानले.



# इतरांना मोठे झालेले पहाण्यात आनंद मानणारे, श्री भागवत गुरुजी चित्तळवेढे येथील आदर्श शिक्षक कै.उमाजी शंकरराव भागवत, गुरुजी ( वय ९७ वर्षे ) यांचे देहावसान

## तुका म्हणे एक मरणाची सरे ! उत्तमची उरे किर्ती मागे !! ( तु.म.)











मानवी जीवनात जन्म आणि मृत्यू या दोन बाबी शाश्वत आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत माणसांना लाभलेला काळ म्हणजेच आयुष्य. अर्थात ईश्वर कृपेने प्राप्त झालेले आयुष्य माणूस किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला हेच जनमाणसांना अभिप्रेत असते.कारण कोणत्याही व्यक्तीच्या जीवनप्रवासाचे मूल्यांकन त्याच्या मृत्यूनंतरच होत असते.

चित्तळवेढे, ता.आकोले (अहिल्यानगर) या गावचे सुपुत्र श्री उमाजी शंकरराव भागवत गुरुजी यांचे दि.१०-०९-२०२६ रोजी वयाच्या ९७ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.. भागवत काका या नावाने ते सर्वत्र सुपरिचित आहेत. गेली ७५ वर्षे शिक्षण, सामाजिक, तसेच धार्मिक क्षेत्रात समर्पितपणे योगदान देणारं आदर्श व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा सर्वच जनमाणसांमध्ये लौकिक आहे. विशेषकरून शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि व्यक्ती म्हणून त्यांचे समाजामधील स्थान सर्वांसाठी दीपस्तंभाप्रमाणे प्रेरणादायी आहे.

देवाचिया गावा आलिया ! जन्म मृत्यूच्या सोहळिया !!
ना म्हणो नये धनंजया ! येणे परी !!

मानवी जीवनात सर्वच लोक जन्माचा आनंदोत्सव म्हणून सोहळा करतात.तथापि मृत्यूचाहि सोहळा व्हावा असे ज्ञानेश्वर माऊलींना अभिप्रेत आहे. त्यासाठी आयुष्यभर सत्कर्मे आणि सत्कार्य यांच्यातून संचयीत केलेला पुण्यसंचय व्यक्तीच्या निर्वाण प्रसंगी एका सोहळ्यात परावर्तित होत असतो.कै.भागवत गुरुजी (काका ) हे अत्यंत कृतार्थ असे जीवन जगले.ते आपल्या जीवनप्रवासात पूर्णपणे कृतकार्य झाले.म्हणुनच त्यांचे अंत्येष्टीसमयी लोटलेला जनसागर याची ग्वाही देत आहे. त्यांच्या ९७ वर्षाच्या प्रदीर्घ जीवनप्रवाहात एक आदर्श शिक्षक, जबाबदार पालक, आणि समाज कार्यातील दायित्व यामुळे त्यांचा जीवनप्रवास खूपच उल्लेखनीय आहे.

चित्तळवेढे गावात चौथीपर्यंत शिक्षण घेऊन ४ मैल दूर असलेल्या राजूर गावात पायी चालत जाऊन ७ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्याकाळी जवळपास तशी माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती आणि दूरच्या मोठ्या गावात शिक्षणासाठी मुलांना पाठविणे पालकांना परवडत नव्हते. त्यामुळे भागवत गुरुजींना इच्छा असूनही पुढील माध्यमिक शिक्षणापासून वंचित व्हावे लागले. त्याचबरोबर गुरुजींचे वडील कै. शंकरराव भागवत हे पंचक्रोशीतील एक मान्यवर असे व्यक्तिमत्व. त्यांचा सुतारकामाचा व्यवसाय.

कृषीप्रधान देशात शेती हा मुख्य व्यवसाय. या व्यवसायाला लागणारी शेती मशागतीची सर्वच औजारे पुरवण्याचे महत्त्वाचे काम सुतार समाजाला करावे लागत असे.

भागवत गुरुजींच्या वडिलांकडे ४ गावाच्या बलुतेदारीचा मोठा व्याप असणारा कार्यभार होता. यामुळे श्री भागवत गुरुजींना वडिलांचे सुतार कामात मदत करण्यासाठी गरज म्हणून घरीच थांबावे लागले..

महत्त्वाची बाब म्हणजे चित्तळवेढे हे गाव पूर्वीपासून अत्यंत धार्मिक आणि सात्विक.

अनेक किर्तनकार या गावात सतत किर्तन-प्रवचनासाठी येत असत. त्यांचे वास्तव्य हे नेहमी भागवत गुरुजींचे घरीच असायचे. त्यामुळे सहाजिकच श्री भागवत गुरुजी यांचेवर धार्मिकतेचे व सात्त्विकतेचे संस्कार घडवले गेले. अर्थात याच धार्मिक व्रतात ते शेवटपर्यंत वावरले आहेत.

गुरुजींचे वडील कै.शंकरराव मिस्त्री हे अत्यंत शिस्तबद्ध स्वभावाचे होते, याशिवाय गावचा संपूर्ण कारभार तेच पहात होते.

संपूर्ण पंचक्रोशीत त्यांच्या स्वच्छ ,निर्मळ व सामाजिक वृत्तीमुळे त्यांच्या आदर्श नैतिकतेचा सर्वत्र प्रभाव होता.

गावातील सर्वच कार्यक्रम व उपक्रम त्यांचेच नेतृत्वात चालत असत. विशेष म्हणजे गावातील प्रत्येकाचे ते आदर स्थानी होते..

यामुळेच श्री भागवत गुरुजी यांना सामाजिक कार्याचा मोठा वारसा प्राप्त झाला.

याच वेळी श्री भागवत गुरुजी यांना नोकरीसाठी केलेल्या अर्जाची दखल होऊन त्यांना जिल्हा परिषदेत (त्यावेळचे शिक्षण बोर्ड ) शिक्षकाची नोकरी मिळाली. आणि अकोले तालुक्यातील धामणगाव पाट या गावात त्यांच्या ज्ञानदान यज्ञाचा आरंभ झाला.

शिक्षण क्षेत्रात कार्यरत असतांना केवळ साचेबद्ध अभ्यासक्रम शिकविण्याच्या पलिकडे जाऊन मुलांना आदर्श व सुसंस्कारित करण्याकडे त्यांचा कल राहिला.

**गुरु तेथे ज्ञान ! ज्ञानी आत्मदर्शन !**
**दर्शनी समाधान ! आथी जैले !!**

गुरु म्हणजेच शिक्षक. कै.भागवत गुरुजींना प्राप्त झालेली शिक्षक उपाधी त्यांनी केवळ अर्थार्जनाचे एक साधन न मानता गुरुचे खरे दायित्व आचरणात, आणून विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ज्ञानप्रकाश देण्याचे महान कार्य प्रामाणिकपणे त्यांनी केले.

आपले विद्यार्थी उच्च ध्येयासक्तीने प्रेरित होऊन खूप मोठे व्हावेत ही त्यांची शिक्षक म्हणून धारणा होती. अर्थात त्यांनी ती शेवटपर्यंत जपली.त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसमोर आदर्शाची पेरणी करताना आपलेही आचार, विचार आणि वर्तन हे आदर्शच असले पाहिजे या मौलिक विचार धारेचे त्यांनी आयुष्यभर संवर्धन केले.

त्यांच्या याच ज्ञानदान तपाचे फलीत म्हणून आज त्यांच्या जवळ ज्ञानार्जन केलेले असंख्य विद्यार्थी अनेकविध क्षेत्रात मोठ-मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. अर्थात या सर्वांच्या या यशाचे श्रेय ते मोठ्या आपुलकीने व कृतज्ञतेने श्री भागवत गुरुजी यांनाच देतात. हिच कै. भागवत गुरुजींच्या ज्ञानदान यज्ञाच्या प्रदीर्घ कार्यकाळातील कृतार्थता आहे..

**कृपादान केले संती ! कल्पांतिही सेरना !!**

याच कृतार्थ भावनेने

श्री भागवत गुरुजींचे सर्व शिष्यगण त्यांचेकडे आजही पहात आहेत, याशिवाय वेळोवळी त्यांना प्रत्यक्ष भेट घेऊन कृतज्ञतेने आशिर्वाद घेत होते.

कै.भागवत गुरुजी यांनी टाहाकारी, विठे, चित्तळवेढे येथे मुख्याध्यापक तसेच लिंगदेव येथे गटप्रमुख म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे सेवादान केले. एक आदर्श गुरु म्हणून त्यांचा सर्वच जनमाणसात मोठा लौकिक आहे.

दुपारी महत्त्वाची बाब म्हणजे श्री भागवत गुरुजी यांना आणखी ४ भाऊ तीन बहिणी. घरातील सदस्यांची संख्या मोठी. त्यात गुरुजी सर्वात मोठे. त्यामुळे नोकरी बरोबरच मोठ्या परिवाराच्या सर्वांगिण गरजांची जबाबदारी त्यांच्यावर लवकरच आली.कारण वडिल लवकरच वार्धक्याकडे वळले होते. त्यामुळे धाकट्या भावंडांचे शिक्षण, लग्नकार्य त्यांच्या गरजा यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या ते यथार्थपणे पार पाडीत होते. यामुळेच मोठ्या कुटुंबाचे दायित्व त्यांनी अत्यंत जबाबदारीने पार पाडले.

शिक्षण क्षेत्रात कार्यरत असतांनाच पंचक्रोशीतील राजकीय व सामाजिक कार्यातील अनेक मान्यवरांचा सहवास त्यांना लाभला तथापि राजकीय विचारांचा स्पर्ष त्यांनी स्वतःला कधीच लाऊन घेतला नाही. अकोले तालुक्यातील राजकीय क्षेत्रातील ऋषीतुल्य व्यक्तीमत्व, पंचायत समितीचे उपसभापती कै.किसन नाना आरोटे हे कै. काकांचे शेवटपर्यंतचे परम स्नेही. कोणत्याही सामाजिक, राजकीय क्षेत्रातील घडामोडींसाठी ते कै.भागवत गुरुजींबरोबर विचार-विनिमय करीत असत.

हे सर्व करीत असतानाच सामाजिक व धार्मिक कार्यातील त्यांचा सहभाग आणि योगदान हे नेहमीच उल्लेखनीय ठरले आहे. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे असलेल्या अत्यंत प्रशस्त अशा विश्वकर्मा समाज धर्मशाळेच्या विकासात आणि विस्तारात त्यांनी मोठ्या प्रमाणात अत्यंत समर्पितपणे सहभाग नोंदविला आहे. धर्मशाळेच्या व्यवस्थापन प्रक्रियेत नियमितपणे संस्थेचे हिशोब लिहीणे, तसेच गेली ५० वर्षे ते धर्मशाळेत सातत्याने अन्नदान करीत होते.

गावातील तसेच पंचक्रोशीतील अनेक गावांतील सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यक्रमात ते नेहमीच अग्रस्थानी राहून सहकार्य करीत होते.

चित्तळवेढे गावात ७५ वर्षांपूर्वी नवीन हनुमान मंदीराचे उभारणी काम सुरू झाले. लाकडांवर अत्यंत सुबक कोरीव काम करून मंदिर खूपच देखणे झाले आहे. या बांधकामाचे नेतृत्व आणि दायित्व कै. भागवत गुरुजी यांचे वडील कै.शंकरराव मिस्त्री यांचेकडे होते. तथापि मंदिर उभारणीसाठी होणारा सर्व जमाखर्च कै. भागवत गुरुजी यांनी अत्यंत चोखपणे सांभाळत आपले भरीव योगदान समर्पित केले.

चित्तळवेढे गावातील गोपाळ दूध संस्थेचे ते काही काळ चेअरमन होते, याशिवाय विठे आणि चित्तळवेढे विविध कार्यकारी सोसायटीचे ते व्हाइस चेअरमन पदावर अनेक वर्षे कार्यरत होते. तसेच चित्तळवेढे गावातील प्रशस्त अशा विठ्ठल मंदिराचे उभारणीत हिरीरीने भाग घेऊन योगदान दिले आहे. चित्तळवेढे गावातील वरसुआई माता मंदिराचे जिर्णोद्धार कामात मोलाचे साहाय्य करुन याच देवीच्या वार्षिक यात्रोत्सवाची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांनाच जाते आहे. आपल्या गावातील वार्षिक हरीनाम सप्ताहाचे आयोजन व त्या कार्यक्रमाचे हिशोब लिहीण्याचे काम त्यांनी चोखपणे पार पाडले.

कै. भागवत गुरुजी यांना तीन मुले असून थोरले चिरंजीव श्री सुभाष हे अलिकडेच शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी विद्यालयातून उपप्राचार्य पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. द्वितीय चिरंजीव श्री शरदनाना हे ठाणे येथे एका कंपनीत कामाला आहेत. व तिसरे चिरंजीव किरण भागवत सर हे उच्च शिक्षित असून राजूर येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्राचार्य पदावर कार्यरत आहेत. हिंदी भाषेत त्यांचे प्राविण्य असून ते राष्ट्रभाषा हिंदीचे प्रचार व प्रसार कार्यात कार्यरत आहेत.

त्यांचे एक जावयी ह.भ.प.दिपक जेवणे हे भारतीय विचार साधना या संस्थेचे संपादक असून श्रीक्षेत्र आळंदी येथे त्यांची किर्तन प्रबोधीनी ही आदर्श अशी वारकरी शिक्षण संस्था आहे.. दुसरे एक जावयी ठाणे येथे कार्यरत आहेत. आणि तिसरे जावयी अगस्ती सहकारी साखर कारखान्यातील महत्वाचे पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.

श्री भागवत गुरुजी यांचे पाचही नातू उच्च शिक्षण प्राप्त करून ख्यातनाम क्षेत्रात कार्यरत आहेत कै.भागवत गुरुजी यांचे एक बंधू ह.भ.प. शिवनाथबुवा हे वारकरी संप्रदायाचे उपासक असून किर्तन प्रवचनकार आहेत. सर्वात धाकटे बंधू नारायण भागवत हे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील विश्वकर्मा धर्मशाळेत विश्वस्त पदावर असून श्रीक्षेत्र आळंदी येथील विश्वकर्मा धर्मशाळेतचे आजिव सभासद असूनही पुणे ( सांगवी ) अनेक सामाजिक संस्थाचे मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत.

कै. भागवत गुरुजी यांनी आपल्या उदंड आयुष्यात सतत अनेक व्यक्तींना मार्गदर्शन तसेच प्रेरणा देण्याचे मोठे काम केले आहे. आपल्या संपर्कातील असंख्य व्यक्ती उच्च पदावर असल्याचे पाहून त्यांना खर्या अर्थाने कृतार्थ झाल्याचे मौलिक समाधान लाभत आहे.

**श्री भागवत गुरुजी यांचे बोलणे अत्यंत संयमी,नम्र आणि सात्विकतेने युक्त असे नेहमीच असायचे.**
**साच आणि मवाळ ! मितुले आणि रसाळ !!**
**शब्द जैसे कल्लोळ ! अमृताचे !!**

या संतोक्तीप्रमाणे त्यांची वाणी सर्वांना मोहित करणारी होती.

अखेर , १० सप्टेंबर रोजी त्यांनी सर्वांचा निरोप घेतला. आणि आपल्या इहलोकीच्या महान कार्य यज्ञाचा समारोप केला. खरंतर केवळ भागवत परीवाराचाच नव्हे तर सर्वांचाच आधारवृक्ष लोपला आहे. कै.भागवत गुरुजी ९७ व्या वर्षे जीवन जगले परंतु अगणित व्यक्तींच्या सद्भावनांचा प्रचंड मोठा संचय त्यांनी संपादित केलेला आहे.

कै.भागवत गुरुजी यांचे प्रदीर्घ काळातील कार्य आणि जोडलेला स्नेहसमूह त्यांना विसरणे कदापीही शक्य नाही. शेवटी म्हणावे लागेल........

**गेले दिगंबर ईश्वर विभूती ! राहिल्या त्या किर्ती जगामाजी !!**
**वैराग्याच्या गोष्ट ऐकल्या ज्या कानी !**
**पुन्हा ऐसे कोणी होणे नाही**
**कै.भागवत गुरुजी यांना अत्यंत भावपूर्ण श्रद्धांजली......**
**!! ओम शांती !!**

**शब्दांकन**
**नारायण भागवत पुणे, व भागवत परिवार चित्तळवेढे. संकलन डॉ विश्वासराव आरोटे संपादक दैनिक समर्थ गांवकरी कळसुबाई शिखरावरून.**